# माणूस

शनिवार । २१ मार्च १९८१ । एक रुपया

# पुण्यातले पोलीस

- पुण्यातल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांवर पोलिसांचा लाठीहल्ला.
- गुडलक चौकात ट्रॅफिक पोलिसाला जमावाकडून मिळालेला धडा.
- लोकमान्य नगरात घरात घुसून महिलेची भरदुपारी लुबाडणूक.
- पोलीस आयुक्तांच्या मुलावर अज्ञात इसमांचा चाकूहल्ला...

९ ते १६ मार्च या एकाच आठवड्यात
घडलेल्या या चार घटनांचा घेतलेला **मा गो वा**

# पुण्यातले पोलीस

सोमवार, ता. ९ मार्च. पुण्यातल्या अभियांत्रिकी कॉलेजसमोर अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजसमोरचा मुंबई-पुणे रस्ता अडवून धरला. दोन तास वाट पाहूनही विद्यार्थी बाजूला हटत नाहीत, असं लक्षात आल्यावर दुपारी पावणेदोनच्या सुमारास पोलिसानी कारवाई करण्याची पूर्वसूचना दिली. विद्यार्थ्यांच्या घोषणा जास्तच वाढल्या. कोणी तरी उत्साहाच्या भरात पोलीसव्हॅनच्या बॉनेटवर चढून तिचा पत्रा वाजवायला सुरुवात केली. आता मात्र पोलिसांची सहनशक्ती संपली! ढालीसारख्या जाळ्या हातात घेतलेले एस. आर. पी चे जवानही रस्त्यावर उतरवलेले होतेच. अचानक लाठीमाराला सुरुवात झाली! पोरं वाट फुटेल तिकडे पळू लागली. थोड्याच वेळात बहुतेकानी कॉलेजच्या इमारतीचा आसरा घेतला. एव्हाना दहा-बारा जणाना तरी लाठीचा प्रसाद मिळाला होता जे विद्यार्थी पोलिसांच्या हाती लागले होते त्याना पोलिसानी यथेच्छ तुडवल होतं. त्यामुळं विद्यार्थी जास्तच भडकले. कॉलेजच्या इमारतीमधून मोठमोठे दगड रस्त्यावर पोलिसांच्या दिशेने यायला सुरुवात झाली. पोलिसानीही तेच दगड उचलून इमारतीमधल्या विद्यार्थ्यांच्या दिशेने भिरकावयाला सुरुवात केली. संधी मिळेल तेव्हा पोलीस कॉलेजच्या इमारतीमध्येही शिरून हाती लागतील त्या पोराना यथेच्छ बडवून काढत होते!

शेवटी कॉलेजच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ आनंदस्वामी व इतर काही विद्यार्थी पोलिसांच्या लाठ्या-दगडांचा मारा चुकवत पुढे आले आणि त्यानी शांतता प्रस्थापित केली दोन्ही बाजूचे जखमी हळूहळू बाहेर येऊ लागले. त्याची हॉस्पिटलात रवानगी होऊ लागली. पोलिसांच्या निर्घृण लाठीमारामुळे विद्यार्थी अतिशय संतापले होते. या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ दुसऱ्या दिवशी पुण्यातल्या सर्व विद्यार्थ्यांचा मूक मोर्चा काढण्याचा निर्णय त्याच दिवशी संध्याकाळी घेण्यात आला.

याच दिवशी संध्याकाळी डेक्कन जिमखान्यावरील गुडलक चौकात पोलिसांच्या मग्रुरीचा प्रत्यय देणारा आणखी एक प्रकार घडला.

एक सायकलस्वार भुयारी मार्गावरील पुलावरून 'नो एन्ट्री'तून गुडलकच्या चौकात आला. तिथल्या वाहतूकनियंत्रण शाखेच्या पोलिसाने त्याला अडवलं, सायकलस्वाराची आणि पोलिसाची काही तरी बाचाबाची झाली आणि त्या पोलिसाने सायकलस्वाराला सायकलवरून खाली खेचून रस्त्यावर आपटल!

आता मात्र सायकलस्वार खवळला. भोवताली चाळीस-पन्नास जणाचा जमावही जमला. ट्राफिक पोलीस घाबरला समोरूनच येणाऱ्या पी. एम. टी. बसमध्ये उडी मारून त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण सायकलस्वाराने रिक्षातून त्याचा पाठलाग केला व एका स्टॉपवर बस थांबली असता त्या पोलिसाला पुन्हा धरून डेक्कन जिमखाना पोलीस चौकीवर आणलं पोलीसाविरुद्ध तक्रार नोंदवण्यात आली. त्या पोलिसाची तात्पुरती बदलीही करण्यात आली व पुढील चौकशीला सुरुवात झाली.

या घटनेनंतर एक-दोन दिवसातच गुंडगिरीचे दोन प्रकार पुण्यात घडले. त्यापैकी पहिला प्रकार तर लोकमान्यनगरसारख्या दाट वस्तीमध्ये भर दुपारी घडला. सौ. हर्डीकर नावाची एक महिला घरात असताना दोन चोरट्यानी घरात घुसून, सुरा दाखवून तिच्या अंगावरचे दागिने लांबवले आणि नंतर पुढल्याच दिवशी पुण्याचे माजी पोलीस आयुक्त एस. जी. सहस्रभोजने याच्या मुलावर चाकूहल्ला करण्याचा प्रयत्न झाला!

एका आठवड्यात घडलेल्या या चार घटना! पहिल्या दोन पोलिसांची बेमुर्वतखोरी, दंडुकेशाहीच्या निदर्शक, तर वर उल्लेखिलेल्या दोन प्रकरणाचा चार-सहा दिवसात काहीही तपास लावू न शकणारे पोलीस शिथिल, उदासीन, असहाय्य झाल्यासारखे वाटतात. एकाच आठवड्यात अशा चार प्रकारच्या चार गंभीर घटना घडल्याने पुण्यातल्या पोलिसाचा जरा खोलवर जाऊन विचार करण्याचा प्रयत्न इथे केला आहे. शिवाय अष्टेकर सराफाच्या दुकानावरचा दरोडा हे गेल्या महिन्यातलं पोलिसाच


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : बेचाळिसावा

२१ मार्च १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी · ४४३४५९

ढळढळीत अ'यश डोक्यात कुठे तरी टोचतं आहेच !

*म्हणूनच या संदर्भात पुण्यातले काही* ज्येष्ठ पोलीस अधिकारी व काही सामाजिक कार्यकर्त्यांशी या संदर्भात चर्चा केली. या चर्चेतून जाणवलेले काही विचार इथे मांडत आहे.

पोलिसांची दंडुकेशाही हल्ली थोडीशी वाढल्यासारखी वाटते, याला दोन कारणं आहेत. एक तर इंदिराजींचं शासन म्हणजे पोलिसांच्या हाती सत्ता, असा गैरसमज पोलीस खात्यानेच करून घेतला आहे.त्यामुळे त्यांचा उत्साह काही ठिकाणी उगाचच वाढला आहे. मागे एकदा मुख्यमंत्री ए. आर. अंतुले पुण्यात हेलीकॉप्टरने आले असता एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने पत्रकारांना हेलीपॅडवर जाऊ दिलं नाही. पत्रकारांनी सरळ अंतुल्यांकडेच तक्रार केली. अंतुलेंनीही घडल्या प्रकाराबद्दल नापसंती व्यक्त केली व पत्रकारांना शांत केलं पुण्यातल्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ला किंवा सायकलस्वाराला मारहाण हे प्रकार पोलिसांच्या या अवाजवी उत्साहातून घडले. पोलिसांचा वचक असावा, ही गोष्ट मान्य आहे; पण त्यातून पोलिसांसंबंधी जनतेच्या मनात तिरस्कार निर्माण होणंही उपयोगाचं नाही.

विद्यार्थ्यांवरच्या लाठीहल्ल्याच्या प्रकरणात परिस्थिती योग्य तऱ्हेने न हाताळल्याबद्दल पुण्याच्या पोलीस आयुक्तांची तडकाफडकी बदली करण्यात आली. तशी ती होणारच होती; पण हे एक निमित्त मिळालं. या बदलीमुळेही पुण्यातल्या पोलीस खात्यात असंतोष व उदासीनता पसरली आहे, असं एका ज्येष्ठ पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं. काही पोलीस तर संपावर जाण्याचीच भाषा करत आहेत, असही तो म्हणाला; पण अतिउत्साह आणि औदासीन्य या दोन्हींच्या मधलं काही जमतच नाही का ?

गुंडगिरीच्या गेल्या आठवड्यात घडलेल्या दोन घटना थोड्या 'संशयास्पद' आहेत, असा पोलिसांचाच कयास आहे, म्हणून त्या घटनांचा विचार केला नाही तरी रस्त्यावर स्त्रियांच्या अंगावरचे दागिने पळवण्याचे किंवा घरात घुसून लूटमार करण्याचे प्रकार पूर्वीपेक्षा जास्तच नोंदले जात आहेत. शिवाय यापैकी बहुतेक गुन्हे कालांतराने फक्त 'दफ्तरी दाखल' होतात! असं का? पोलीस *याला काहीच आळा का घालू शकत नाहीत ?*

*या संदर्भात एका सामाजिक कार्यकर्त्याशी* चर्चा केली असता ते म्हणाले, 'आय. पी. एस. च्या पातळीवरून जे वरिष्ठ अधिकारी पोलीसखात्यात सामील झाले आहेत ते स्वत बऱ्याच अंशी 'स्वच्छ' आहेतच, शिवाय अशा स्वरूपाच्या गुंडगिरीला आळा घालण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो; पण सबइन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर या पातळीवरची मंडळी, त्यांचे हे प्रयत्न पार धुळीला मिळवतात ! कारण या लोकांचे त्या गुंडांशी 'आर्थिक' लागेबांधे असतात. त्यामुळे एखाद्या ठिकाणी धाड टाकण्याची योजना आखली जात असतानाच ती योजना त्या गुंडालाही कळवली जाते आणि मग तो पुढली सर्व तजवीज आधीच करतो. काही वेळा फक्त कायद्यावर बोटं ठेवणारी आंधळी न्यायालयं गुंडांचा पूर्वेतिहास लक्षात न घेता त्यांना जामिनावर सोडतात आणि पोलिसांना असहाय्य करतात तर काही वेळा कोणा तरी मंत्रिमहोदयांचं पाठबळ गुंडांना मिळतं व त्यांच्याविरुद्ध कारवाई करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर दडपण आणलं जातं. स्वत.ला पुरोगामी म्हणवणाऱ्या एका माजी मंत्र्यानंही हा उद्योग केला आहे

'मटका-जुगार यांच्या अड्ड्यावर पोलीस अधिकारी पैसे खातात, असा एक सार्वत्रिक आरोप आहे. किंबहुना पोलीस खात्यातल्या भ्रष्टाचाराच्या असंख्य कथा सर्वश्रुत आहेत. पुण्यात तर काही अड्डे असे होते की, त्या ठिकाणी अड्ड्याच्या 'दादा'बरोबर एका पोलीस इन्स्पेक्टरचीच भागीदारी होती. एक बडा अड्डेवाला शिक्षा भोगून सुटल्यावर पुण्यातले निरनिराळ्या पोलीस स्टेशनांचे पोलीस अधिकारी तर म्हणे त्याच्यामागे लागले होते की, माझ्याच स्टेशनच्या हद्दीत तुझा अड्डा टाक. कारण अड्डा जेवढा मोठा तेवढी पोलिसांना 'कमाई' जास्त. *काही अड्ड्यावर* तर अड्ड्याचे मालक वर्षामध्ये तीस तीस लाख रुपये कमावतात. अशा ठिकाणी पोलिसांच्या व्हॅन्स येऊन हप्ते घेऊन जातात.'

इन्स्पेक्टर-सबइन्स्पेक्टर पातळीवरचे अधिकारी भ्रष्टाचारी का होतात, याचं एका पोलीस अधिकाऱ्यानंच चांगलं विश्लेषण केलं. तो म्हणाला, 'हल्ली तुमच्या मेडिकल कॉलेजाप्रमाणेच पोलीस खात्यातही 'कॅपिटेशन फी'चं *प्रमाण वाढलं आहे.* सबइन्स्पेक्टरच्या प्रशिक्षणासाठी निवड होणाऱ्या उमेदवारांपैकी जवळजवळ ७० ते ८० टक्के उमेदवार याच मार्गाने स्वतःची निवड करून घेतात. त्यामुळे प्रशिक्षणानंतर कुठही 'पोस्टिंग' झालं की, त्यांचं पहिलं उद्दिष्ट असतं कॅपिटेशन फी भरून काढण्याचं ! मोठमोठ्या पदव्या घेतलेला तुमचा तरुण डॉक्टर जसा आपल्या शिक्षणावर झालेला 'सर्व प्रकारचा' खर्च त्याच्याकडे येणाऱ्या रोग्यांकडूनच वसूल करतो, तसं आमच्या या तरुण पोरांचं होतं. ज्यांच्यावर कारवाई करण्यासाठी त्यांची नेमणूक केलेली असते त्यांच्याकडूनच ते ही कॅपिटेशन फी गोळा करायला लागतात आणि माझं तर असं मत आहे की, तुमच्या प्रेमाच्या धाग्यापेक्षा या पैशाच्या धाग्यानं माणसं जास्त पक्की जखडली जातात. तेव्हा 'Something is rotten in the state of Denmark' हे खरं आहे; पण त्याची सुरुवात 'डेन्मार्क'ची स्थापना होण्याआधीच झालेली असते.

'शिवाय या पैशाचा मोह असा आहे की, आपली कॅपिटेशन फी, शिक्षणावरचा खर्च वसूल झाल्यावर, डॉक्टर आपली फी कमी करतो का ? तो तसं करूच शकत नाही. कारण मोठ्या तोटीच्या नळातूनच पाणी प्यायची सवय लागलेली असते. आमच्या पोलीस खात्यातली माणसंही याला अपवाद कशी असतील ?'

काही वेळा पोलीस दडुकेशाही करत असतील काही वेळा निष्क्रियही राहात असतील, पण त्याचबरोबर नागरिकांकडून पोलिसांना योग्य सहकार्य मिळत नाही. कित्येक वेळा गुन्हा घडून सुद्धा नागरिक तक्रार नोंदवण्यासाठी पुढेच येत नाहीत, अशी पोलिसांची तक्रार असते. याबाबत बोलताना एक कार्यकर्ता *म्हणाला, 'पोलीस खात्याची चौकशीची* आणि तपासाची पद्धत याला बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. आमच्या घरात चोरी झाली, अशी तक्रार नोंदवायला मी गेलो की प्रथम मीच चोर आहे, असं गृहीत धरूनच चौकशीला सुरुवात होते आणि तक्रार

पृष्ठ २३ वर

मुक्ताफळे

# शाम, येशिल ना रे परत ?

अलीकडच्या काळात खूपच मराठी तरुण मुले या ना त्या कारणाने अमेरिकेत गेली. केवळ सधन कुटुंबातील गेली असे नाही. गरिबीतून वर आलेली हुशार मुलेदेखील गेली आणि एकदा ही मुले तिकडे गेली की त्याना परत भारतात मुळी यावेसेच वाटत नाही. एवढा आपला चागला महाराष्ट्र ! ' मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्रदेशा...' सगळं याचं पाठ असतं; पण इकडे यायचं नाव काढीत नाहीत ! अनेक आईवडिलाची ही डोकेदुखी झाली आहे. पूर्वी बहुतेक कुटुंबात लग्न निघाले की मुहूर्त निश्चित करताना उभयता विहिणीच्या आणि वधूच्या स्त्रीसुलभ अडचणीचाच काय तो विचार करायला लागे; पण हल्ली ? एक कार्यालयात जागा मिळण्याची अडचण आणि दुसरी अमेरिकेतली मंडळी लग्नाला कधी येऊ शकतील ते नक्की व्हायला लागते. वराचा किंवा वधूची, बहीण-भाऊ कुणी तरी परदेशात असतातच आणि ही मंडळी फक्त अशा मंगलप्रसंगासाठीच भारतात आली तर येतात ! तेव्हाच काय ती मुलाची आईवडिलाशी भेट झाली तर व्हायची.

आमच्या परिचयातील एका कुटुंबातील एकुलता एक मुलगा इंजिनिअरिंगच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेला. तेथील विद्यालयात राखीव जागांची भानगड नसल्याने त्याला प्रवेश मिळाला. शिकून तो परत येईल या आशेवर आई-वडील आनंदात होते; परंतु नुकतेच त्याचे पत्र आले. त्याने आपण भारतात न येता तिथेच नोकरी करून स्थायिक होण्याचे ठरवले. वडिलानी दोन दिवसापूर्वी त्याला फोन केला. ' इंजिनिअरला सरकारी सेवेत आता राजपत्रित अधिकाऱ्याचा दुसरा दर्जा मिळाला आहे. लवकर ये ! सगळे मिळून सुरुवातीला साडेसातशे रुपये मिळतील !' त्याने फोनवर पुन्हा तेच सांगितले-' मी येणार नाही !' या कुटुंबावर हा मोठाच आघात असल्याने आम्ही समाचाराला गेलो. घरात सगळे उदास वातावरण होते. मुलाच्या आईने सांगितले-' त्याला मी पत्र लिहिले आहे. वाचून पहा. यापेक्षा जास्त आपल्या हाती काय आहे ?' मी पत्र हातात घेत आईला म्हटले-' तुम्ही आता शोक आवरला पाहिजे. शामच्या वडिलांना तुम्हीच धीर द्यायला हवा !' पत्र असे होते-

' प्रिय शामला प्रेमळ आईचे अनेक आशीर्वाद.

तुझे पत्र मिळाले. मागल्या काही पत्रातून तू इकडे कधी येणार यासंबंधी काहीच लिहिले नव्हतेस. माझ्या मनात पाल चुकचुकली. आता तुझे स्पष्टच पत्र आले. तू तिकडेच स्थायिक होणार, हे वाचून माझ्या मनाची काय अवस्था झाली हे तुला कळणार नाही !

मला व तुझ्या बाबाना सोडून तू तिकडे एकटा रहाणार ही कल्पना मला सहनच होत नाही ! अमेरिकेत शहरातून किती गुंडगिरी असते याचे वर्णन करणारा पु. ल. देशपांडे याचा लेख नुकताच यांनी मला वाचून दाखवला, तेव्हा तर माझ्या तोंडचे पाणीच पळाले. आधी तुझे शरीर काय ? लहानपणापासून हे तुला नेहमी सांगायचे की महाराष्ट्र मंडळात जाऊन अगदी कुस्त्या मार असे नाही, पण रोज निदान बारा सूर्यनमस्कार घालीत जा रे शाम-पण तू ते ऐकले नाहीस. अमेरिकन गुंडाने नुसती फुंकर मारली तरी तू उडून जाशील ! छे छे, तिथे तू कसा सुरक्षित रहाणार शाम ?

' अजून तुझे लग्न झालेले नाही. ओळखीपाळखीचे तिकडे जाऊन आलेले लोक सांगतात की, तू तिकडे रोज नक्की दारू पीत असणार ! नको रे पिऊ शाम दारूबिरू. तिकडच्या मुली फार फाजील आणि बेफाम असतात. त्यातल्या एखादीने तुझ्यावर मोहिनी टाकलीसुद्धा असेल ! यामुळे इथेदेखील मुली सांगून येणे कठीण होईल असे सगळे म्हणतात.

ते एक असो, पण आपली मातृभूमी सर्वांना किती किती प्रिय असते ! यांचं संस्कृत काही कधी चांगलं नव्हतं; पण हेदेखील परवापासून दोनदा म्हणाले-शामला सांग, जननी स्वर्गादपि गरीयसि। मलादेखील संस्कृत येत नाहीच; पण मला वाटतं, यात जन्मभूमी हा शब्द गुप्त आहे. तात्पर्य, मातृभूमी ही स्वर्गापुढे अगदी तुच्छ आहे. एवढे मोठे सावरकर ! पण इंग्लंडला होते तेव्हा रोज सायंकाळी मित्र-मैत्रिणींना जमवून समुद्रकिनाऱ्यावर बसून कोरस गीत म्हणत ना- ' ने मजसि ने परत मातृभूमीला। सागरा प्राण तळमळला ॥' या कोरस गीताची टेप तुला यांनी पाठवली होती. काय उपयोग मग अशा टेपचा ? आता सावरकरांना बोटीत बसून समुद्रमार्गे यायचे होते म्हणून ते सागराला- ' परत मातृभूमीला ने ' असे म्हणाले. तुला हेच हवाईसुंदरीला सांगावे लागेल ! मातृभूमी ती मातृभूमी. आम्हाला पण शाळेत ' गोल्डन ट्रेझरी ' होती. त्यात कविता होती-ब्रीदस् व्हेअर द मॅन वुइथ सोल सो डेड-हू नेव्हर टु हिमसेल्फ हॅज सेड-धीस इज माय ओन नेटिव्ह लॅंड-म्हणजे संस्कृतात काय, मराठीत काय, इंग्रजीत काय, एकच सांगितले आहे. मातृभूमीपुढे स्वर्ग तुच्छ आहे ! मातृभूमी ती मातृभूमी ! तेव्हा तू पुन्हा विचार कर आणि पुण्याला परत यायचे ठरवच !

' आता इकडील हकीकत लिहिते. नाही तर नेहमीप्रमाणे तक्रार करशील की, मी पत्रात इकडच्या बातम्या काहीच लिहीत नाही. मुंबईत अनेक महिलाचे खून पडल्याचे मी मागील पत्रात लिहिले होतेच. अजूनही मुंबईला दिवसाआड एखाद्या महिलेचा खून पडतोच; पण आता हे लोण पुण्याला पण पोचले आहे. येथील लोकमान्यनगर या भरवस्तीतील वसाहतीत, परवा दुपारी दीडच्या सुमारास सौ. मेधा सुधीर हर्डीकर या २४ वर्षांच्या महिलेवर असाच प्रसंग गुदरला. सुऱ्याचा धाक दाखवून, तोंडात बोळा कोंबून तिच्या अंगाखांद्यावरील दागिने पळवले. अजून गुंड सापडलेले नाहीत.

दुसरी बातमी म्हणजे, येथील . इंजिनियरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेत, जेव्हा ते पास होऊन त्याना नोकरी मिळेल तेव्हा गॅझेटेड ऑफिसरचा दुसरा दर्जा मिळावा म्हणून रस्ता अडवून, रस्ता अडवू नका म्हणणाऱ्या पोलिसावर दगडफेक केली. पोलिसानी पण मग लाठ्या वापरल्या. विद्यार्थ्यांना पोलिसानी मारले म्हणून पुण्याच्या पोलीस आयुक्ताची ताबडतोब बदली केली. पोलीस सपावर जातो म्हणतो म्हणून पोलीस आयुक्ताच्या मुलावर गुंड विद्यार्थ्यांनी चाकूचे वार केले; हे पण गुंड सापडलेले नाहीत !

मुंबईला सीमाप्रश्न सोडविण्यासाठी शिवसेनेने मुख्यमंत्र्याच्या आशीर्वादाने मोर्चा काढला बरं का श्याम ? शिवसैनिकानी मुख्यमंत्र्याचे दर्शन घेतले आणि मग दगडफेक व मोडतोडीस प्रारंभ केला. फोर्टमधल्या दुकानाच्या शोकेसेस, बोरिबंदर स्टेशनमधील इंडिकेटर, घड्याळे या शूर सैनिकांनी फोडून टाकली ! सॅंडर्स्टरोड आणि करीरोड स्टेशनवरील निऑन साइन्ससुद्धा फोडून टाकल्या. असे हे उग्र सैनिक बरं का शाम !

आसाममध्ये गेले पंधरा–सोळा महिने राज्य–सरकार स्थगितच आहे. आता गुजराथमध्ये उसळलेली दंगलही आटोक्यात येण्याची चिन्हे नाहीत. रोज कुठे ना कुठे गोळीबार आहेच. गुजराथेतले विद्यार्थी पुण्यातल्या विचारवताचे ऐकत नाहीत. गुजरामध्ये विचारवंत नाहीतच का ? प्रश्नच आहे हो शाम !

गल्या आठवड्यात दिवा स्टेशनात दोन मालगाड्याची टक्कर झाली. दोनच माणसे मेली, पण पाच–सहा दिवस मुबई–पुणे वाहतूक बंद होती. मुबईला जाणाऱ्याचे फार हाल झाले. टॅक्सीवाले माणशी शंभर रुपये मागत होते हो शाम !

गेल्या काही दिवसातल्या चटचट आठवणाऱ्या बातम्या लिहिल्या. तसे लिहिण्यासारखे पुष्कळ आहे. भिवंडीला एका मुस्लिम कुटुबातली सगळी माणसं गुंडानी ठार मारली. अल्पवयीन मुलीवर बलात्कार आहेत. रेल्वे–लॉरी टकरा आहेत. बेकाराचे माजी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखालचे मोर्चे आहेत; पण पत्रात लिहिणार तरी किती रे शाम ? पण पुन: एकदा तेच लिहिले की, तू मायभूमीला परत यायचा विचार कर! मातृभूमी म्हणजे स्वर्गादपि गरीयसी ! ही सुजलां सुफलां भूमी तुला खुणावत नाही का रे बाळा? कायम राहण्यासारखा काही अमेरिका देश नाही. सोबत पु. लं. च्या लेखाचे कात्रण पाठवले आहे ते काळजीपूर्वक वाच !

मी व तुझे बाबा तुझ्या पुढील पत्राची वाट पहात आहोत. त्यात तू इकडे परत येण्याचे ठरवल्याची गोड–गोड बातमी असेल, अशी आशा बाळगून. आम्ही आहोत. एक लक्षात ठेव मातृभूमी ती मातृभूमी !'

तुझी वाट पहाणारी
आई

□ ताजा कलम

मागल्या अंकात राखीव जागा प्रश्नावर आणि विचारवताच्या पत्रकावर सही करणाऱ्या एका विचारवंताला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची आपली व्याख्या काय ? असा प्रश्न विचारला होता. या पत्रकावर स्वाक्षरी करणारे एक विचारवत प्रा. अ. भि. शहा यांनी आता असे जाहीर केले आहे की–

'दलिताच्या राखीव जागाखेरीज उरलेल्या जागा भरताना आर्थिकदृष्ट्या दुर्बलाचा प्रामुख्याने विचार व्हावा' असा जो उल्लेख पत्रकात आहे याला माझा विरोध आहे.'

(सकाळ १४–३–८१)

स्वयंसेवकानी निरनिराळ्या जागी स्वाक्षऱ्या घेतल्या म्हणजे कसा घोटाळा होतो पाहिलास ! पुण्यात 'स्वाक्षरीभवना 'ची यासाठीच नितात गरज आहे. आता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या जागाबाबत पुन्हा एक पत्रक अपेक्षित आहे.

—ग्यानबा



# शिक्षणसंस्था व प्राध्यापक

## न्या. सुराणांचा निर्णय

वा. दा. रानडे

प्रा. स. शि. भावे यांच्यावरील आरोपाच्या प्रकरणी पुणे विद्यापीठ कॉलेज ट्रायब्यूनलचे प्रिसायडिंग ऑफिसर श्री. के. सी. सुराणा यानी दिलेला निर्णय केवळ व्यक्तिश भावे यांच्या दृष्टीने नव्हे तर प्राध्यापकाच्या हक्काच्या दृष्टीने आणि शिक्षणसंस्थाच्या कारभारपद्धतीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

या प्रकरणात मुख्य प्रश्न कोणते होते ? प्रा. भावे याना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य आणि प्राध्यापक या दोन्ही पदावरून बडतर्फ करण्यात आले. त्यापैकी प्राध्यापक म्हणून त्यांच्या बडतर्फीच्या प्रश्नावर ट्रायब्यूनल निश्चित निर्णय घेऊ शकले, असे निकालपत्रात म्हटले आहे. प्रा. भावे याना आजीव सदस्यत्वावरून बडतर्फ केल्याने त्याचे प्राध्यापकपदही संपुष्टात येते असा सोसायटीचा मुद्दा होता, तो ट्रायब्यूनलने अमान्य केला आहे. प्राध्यापकाच्या हक्काच्या दृष्टीने प्रा. भावे यांचा हा मोठा विजय आहे. एखादा प्राध्यापक आजीव सदस्य झाला म्हणून प्राध्यापक या नात्याने असलेले त्याचे स्वतंत्र स्थान तो गमावत नाही असे निकालपत्रात स्पष्ट म्हटलेले आहे.

प्रा. भावे याच्यावरील आरोपाची योग्य पद्धतीने चौकशी करण्यात आली नाही. आपल्याला आपली बाजू मांडण्याची संधी दिली नाही, हा प्रा. भावे याचा मुद्दा ट्रायब्यूनलने मान्य केला आहे. भावे याच्या वर्तनाचे चौकशीसाठी आम्ही जी समिती नेमली ती काटेकोर अर्थाने चौकशी समिती नसून, सत्याचा शोध घेणारी समिती होती, असे व्यवस्थापनाचे म्हणणे होते; पण सत्य शोधणाऱ्या समितीने ज्या पद्धतीने काम करायला हवे त्या पद्धतीने या समितीने काम केले नाही. भावे याच्यावरील आरोपाचे लेखी निवेदन यांना समितीने द्यावयास हवे होते आणि आपला बचाव करण्याची योग्य संधी त्याना

द्यावयास हवी होती. समितीने यापैकी काहीच केले न.ही असा ठपका ट्रायब्यूनलने समितीवर ठेवला आहे शिक्षणसंस्थाच्या कारभारपद्धतीच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा आहे. एखाद्या प्राध्यापकावरील आरोपाची चौकशी करावयाची असेल तर विशिष्ट पद्धतीनेच ती केली पाहिजे. आरोपांचे लेखी निवेदन संबंधित प्राध्यापकास मिळायला हवे आणि आपला बचाव करण्याची योग्य संधी त्याला मिळायला हवी. न्या. सुराणा याच्या या निर्णयानंतर आता आपल्यावरील आरोपांची योग्य पद्धतीने चौकशी होते की नाही, याबद्दल प्राध्यापकही यापुढे जागरूक राहतील आणि आपल्याला वाटेल त्या पद्धतीने आरोपाची चौकशी करता येणार नाही, त्यासाठी रीतसर पद्धतीच अवलबली पाहिजे याची दक्षता शिक्षणसंस्थाना घ्यावी लागेल. भावे प्रकरणात डी. ई. सोसायटीच्या निरनिराळ्या समित्यानी जी कार्यपद्धती अवलंबिली ती धक्कादायक होती. नैसर्गिक न्यायाच्या सर्व तत्त्वाविरुद्ध ती होती. घाईघाईने चौकशी करून बडतर्फीचा निर्णय घेण्यात आला. योग्य पद्धतीने चौकशी झालेली नाही, हे स्पष्ट असल्याने बडतर्फीचा हुकूम रद्द करण्यात येत आहे, असे न्या. सुराणा यानी निकालपत्रात म्हटले आहे.

चौकशी सदोष पद्धतीने करण्यात आली असा न्या. सुराणा यांचा निष्कर्ष असेल तर सत्यशोधक समितीने प्रा. भावे याच्याविरुद्ध ठेवलेले आरोप न्या. सुराणापुढे पुरावा देऊन सिद्ध करण्याची आमची तयारी आहे, असे सोसायटीने ट्रायब्यूनलपुढे सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले होते; पण ट्रायब्यूनलपुढे भावे याचे अपील सुनावणीसाठी आले तेव्हा सोसायटीने ही भूमिका बदलली आणि ट्रायब्यूनलपुढे आम्हाला आरोप सिद्ध करावयाचे नाहीत असे स्पष्ट निवेदन त्याच्या वकीलाने केले. आरोप सिद्ध करण्यापासून सोसायटीने माघार का घेतली? आरोप सिद्ध करण्याइतका भक्कम पुरावा आपल्याजवळ नाही असे सोसायटीला दिसून आले व त्यामुळे तिने पवित्रा बदलला असावा, असे अनुमान यावरून निघू शकते. भक्कम पुराव्याचे सोसायटीने आणलेले अवसान अशा रीतीने गळून पडले.

सोसायटीकडे निरनिराळ्या व्यक्तीनी भावे याच्यावरील आरोपासंबंधी किंवा त्याच्या वर्तनासंबंधी जी निवेदने सादर केली ती चौकशीच्या काळाचे आसपासच सादर केलेली आहेत. सोसायटीचे व्यवस्थापनास या गोष्टी चौकशीच्या काळातच कळल्या काय याचे आकलन होणे कठीण आहे. व्यवस्थापनाने भावे यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई यापूर्वी का केली नाही? भावे आणि सोसायटी यांच्यात वाद उपस्थित झाल्यानंतरच ती का केली, असे प्रश्न न्या. सुराणा यानी उपस्थित केले आहेत. याच वेळी हे आरोप करण्याने सोसायटीच्या हेतूबद्दल शंका निर्माण होते. प्रा. भावे आणि सोसायटी याच्यात वाद उपस्थित झाला नसता तर सोसायटीने त्याच्याविरुद्ध कारवाई केलीही नसती. यावरून आकसाने ही कारवाई करण्यात आली असा तर्कसंगत निष्कर्ष निघू शकतो. शिक्षणसंस्थामध्ये गट असतात, आकसाने कारवाया केल्या जातात. त्याचेच दर्शन भावेप्रकरणात घडते. भावे आणि डी. ई. सोसायटी ही या प्रकरणी प्रतीकात्मक आहेत. कमी-अधिक प्रमाणात सर्वच शिक्षणसंस्थात असे प्रकार चालू असतात. त्यातले बरेचसे दाबले जातात, फारच थोडे असे प्रकाशात येतात.

डी. ई. सोसायटीसारख्या शंभरीच्या सीमेवर असलेल्या आणि टिळक-आगरकराची परंपरा सांगणाऱ्या संस्थेत जेव्हा असे प्रकार होऊ लागतात तेव्हा शिक्षणसंस्थाबद्दल विद्यार्थ्यांना आदर कसा वाटावा? आपल्या शिक्षणसंस्थाचा कारभार किती सडलेला आहे याचे दर्शन अशा प्रकरणांतून घडते. 'डी. ई. सोसायटीसारखी आद्य संस्था या प्रकरणी योग्य पद्धतीने न वागता सूडभावनेने वागली याचे दुःख होते!' असे न्या. सुराणा यानी म्हटले आहे.

प्रा. भावे याच्या चारित्र्यासंबंधी निरनिराळ्या व्यक्तीनी निवेदने सादर केली. यावरून ती बरोबर आहेत असे सिद्ध होत नाही. एखाद्या व्यक्तीच्या वर्तनासंबंधी कुजबूज होते, अफवा पसरतात; पण त्या खऱ्या असतीलच असे नाही. अशा कुजबुजीवर व अफवावर विश्वास ठेवला तर त्या व्यक्तीच्या लौकिकाची अपरिमित हानी होण्याचा संभव आहे. तसेच तिला न्याय मिळणार नाही असा अभिप्राय न्या. सुराणा यांनी व्यक्त केला आहे.

हे सारेच प्रकरण आमच्या शिक्षणसंस्थाचे कारभारावर विदारक प्रकाश टाकते. भावे यानी मिळवलेल्या विजयामुळे अशाच प्रकारचा किंवा अन्य प्रकारचा अन्याय झालेल्या प्राध्यापकाना त्याविरुद्ध लढण्यास नवे बळ येईल.

ट्रायब्यूनल नेमून प्राध्यापकांना आपल्यावरचे अन्याय दूर करून घेण्याची सोय झाली त्यामुळेच प्रा. भावे याना हा न्याय मिळू शकला, हेही विसरून चालणार नाही. शिक्षणसंस्थाचे कार्यपद्धतीत व कारभारात सुधारणा होण्याच्या दृष्टीने या निर्णयानंतर पावले पडू लागली तरच त्याचा खऱ्या अर्थाने उपयोग झाला असे म्हणता येईल. □

# मी जे वांछीन ते तो लिहो....

[ स्थळ — मंत्र्यांची कचेरी. दोन-चारजण बसलेले. टेबलावर वर्तमानपत्राचा ढीग. मंत्री वैतागलेले. ]

मंत्री : (जोरजोरानं घंटा वाजवून) कोण आहे रे तिकडे?

शिपाई : (आत येत) मी आहे, साहेब!

मंत्री : टेबलावर हा कसला पसारा माडून ठेवलायस? आवराआवर केली नाहीस?

शिपाई : केलीय साहेब; पण ही ताजी वर्तमानपत्रं आहेत म्हणून आपल्याला वाचायला ठेवलीयत.

मंत्री : (चिडून) वर्तमानपत्रं? या मोठ्या कागदाना तू 'वर्तमानपत्रं' म्हणतोस? आमची वर्तमानपत्राबद्दलची मत माहीत नाहीत तुला? आम्ही केलेली नवी घोषणा कळली नाही तुला?

शिपाई : आपला कारभार इतका धडाडीचा आहे साहेब, की आपण रोज कसल्या ना कसल्या घोषणा करता. त्यामुळे ..

पृष्ठ २१ वर

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ आपण अजून दरिद्री का ?

देश स्वतंत्र होऊन तीस वर्षे झाली. एका मागूनएक पंचवार्षिक योजना मागे पडल्या. जनता सरकार असताना वार्षिक नियोजनाच्या (रोलिंग प्लॅनच्या) योजना राबवून झाल्या. कोटयवधी रुपये खर्ची पडले, पडत आहेत; पण अजूनही आपण दरिद्रीच आहोत! अधिक सुसंस्कृत शब्द वापरायचा झाला तर ' अविकसनशील अवस्थेमध्येच आहोत ' दारिद्र्याबरोबर चाललेल्या या संघर्षामध्ये आपली आर्थिक ताकद कमी पडते हे तर खरे आहेच; पण एकंदरीतच आपला समाज सगळयाच बाबतीत किती कमालीचा उदासीन आणि निष्क्रिय आहे याचे मोठे मजेशीर वर्णन टी. ए. पै यानी एका लेखामध्ये केले आहे. पैसाहेब अर्थतज्ञ आहेत केंद्रीय शासनामध्ये दीर्घकाळपर्यंत त्यांनी मंत्री म्हणून काम बजावले असून रेल्वे व उद्योग यासारखी महत्वाची खाती साभाळली आहेत. आपल्या लेखामध्ये अजून आपण दरिद्री का, याचे विश्लेषण करताना पै साहेबानी मंत्री म्हणून काम करत असताना जे मजेशीर अनुभव आले ते तर आपल्या खाशा शैलीत पेश केले आहेतच, पण खेरीज आपल्या समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांनी जे बोचरे भाष्य केले आहे ते विलक्षण भिडणारे आहे.

रेल्वेखात्याचे मंत्री म्हणून काम करत असताना मुंबईजवळील कल्याणस्टेशनला त्यानी भेट दिली. तेथील प्रकाशयोजना अपुरी असल्याने त्यामध्ये तातडीने सुधारणा करण्यात याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. दिल्लीला गेल्यावर संबंधित फाइल मागवून घेऊन त्यामध्ये तपशीलवार टिपण लिहिले व तातडीने कार्यवाही व्हावी, असा सुस्पष्ट आदेशही लिहिला. हा सारा प्रकार १९७२ साली घडला. पुढे १९७९ साली हीच फाइल पुन्हा त्यांच्याकडे आली. पूर्वी मंजूर झालेल्या रकमा खर्ची घालून हे काम होण्यासारखे नसल्याने वाढीव रकमा मंजूर कराव्यात, असे मंत्रीमहोदयाना सुचवण्यात आले होते. सात वर्षांपूर्वी जी योजना मजूर केली तिची कार्यवाही का झाली नाही याची चौकशी केली असता जबाबदार अधिकाऱ्यांकडून असे सागण्यात आले की, चार वर्षे फाइलच बेपत्ता होती!

रेल्वेखाते आणि कोळसावाहतूक याबाबत वारंवार तक्रारी ऐकू येतात. याबाबत पैसाहेब लिहितात, ही दोन्ही खाती एकमेकाविरुद्ध ओरडाआरडा करण्यातच गुंतलेली असतात. जेव्हा रेल्वे वाघिणी उपलब्ध करून देऊ शकते त्या वेळी कोळसा नसतो आणि जेव्हा कोळसा उपलब्ध *असतो त्या वेळी रेल्वे-वाघिणी अन्यत्र गुतलेल्या* असतात तेल आयात करावे लागत असल्याने इधनासाठी कोळशाचा वापर व्हावा असे आपले धोरण असले तरी प्रत्यक्षात कोटयवधी रुपयाचे डिझेल जाळून ट्रक्समधून कोळशाची वाहतूक केली जाते. औष्णिक वीजकेंद्राना कोळसा पुरवला की, काही दिवसानी तक्रार येते की, पुरवण्यात आलेला कोळसा हलक्या प्रतीचा आहे, सबब निरुपयोगी आहे पुन्हा ट्रक्सचे ताफे उभे राहतात, डिझेल जाळत इंधन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेले जाते आणि या साऱ्या प्रकारात कोणालाही काहीही वावगे वाटत नाही. आपली विद्युत्महामंडळे इतक्या भिकार अवस्थेमध्ये आहेत की, उत्पादनक्षमतेच्या ४०% हून जास्त वीज निर्माण होऊ शकत नाही. एखाद्या ठिकाणी हे प्रमाण थोडे वाढले तरी परमेश्वराचे आभार मानावे अशी अवस्था आहे विद्युत्वापर आणि विद्युत्पुरवठा याबाबत इतका सावळागोंधळ आहे की कोटयवधी रुपयाचे नुकसान प्रतिवर्षी सोसावे लागत आहे. फारच झाले तर चौकशी समिति नेमली जाते गलेलठ्ठ *अहवाल तयार होतात आणि ते दप्तरी दाखल होतात !*

उपलब्ध साधनसामग्री आपण किती बेजबाबदारपणे वापरतो याचा तपशील पुरवताना पैसाहेब म्हणतात : जीवनावश्यक वस्तूंचा अपुरा पुरवठा आपण खपवून घेतो. त्यात सुधारणा व्हावी म्हणून आपण काहीएक करत नाही. किंमती भडकत असतात, लोकाचे जीवन असह्य झालेले असते, त्याकडेही आपण दुर्लक्ष करतो आणि एशियन गेम्स दिल्लीमध्ये व्हावेत यासाठी युद्धपातळीवर हालचाली करून तयारीला लागतो. कोटयवधी रुपये *त्यासाठी* खर्ची घालतो. आतरराष्ट्रीय पातळीवर आणि ऑलिंपिकसारख्या जागतिक स्पर्धेमधून आपली काय दयनीय अवस्था आहे हे माहीत असूनही एशियन गेम्ससाठी आपण आटापीटा करत राहतो. आपले भाषेबाबतचे प्रश्न आपण सोडवू शकत नाही; पण तरीही भाषाविषयक जागतिक परिषद भरवून एक कोटी रुपये खर्च करताना आपल्याला काहीही वाटत नाही. ज्या गोष्टीची तूट आहे त्याच्या उत्पादनवाढीवर तर आपले लक्ष नसतेच, पण उपलब्ध मालही आपण योग्य प्रकारे वापरत नाही. सिमेंट आणि कागद याचा वापर आपण ज्या बेदरकार पद्धतीने करतो त्यावरून हीच गोष्ट सिद्ध होते.

जनता पक्ष सत्तेवर आला आणि काँग्रेसने गेल्या तीस वर्षांत काही केले नाही हे ओरडून सागण्यात त्यांनी दोन वर्षे खर्ची घातली पुन्हा सत्तातर झाले आणि आता सत्तेवर असलेली मंडळी जनता पक्षाने दोन वर्षात कसे वाटोळे केले याचा तपशील पुरवण्यात मश्गुल होऊन गेलेली आहेत. कोणत्याही गोष्टीबाबत निर्णय घेण्याची क्षमताच नाहीशी झाल्याची तक्रार करून पै पुढे लिहितात : कालबद्ध कार्यक्रमाच्या घोषणा आपण करतो. काल मागे पडतो. घोषणा *कागदावरच राहतात आणि कार्यक्रम ठप्प होऊन पडलेले असतात !* याबाबतचा तपशील देताना पैसाहेब लिहितात. १९७० साली बंगलोर-गुटकळ रेल्वेलाइनचे काम सुरू झाले. पाच वर्षांत काम पूर्ण होईल असे वाटले होते; पण नाही. अजूनही हे काम अपूर्णच आहे ! हसन-मंगळोर रेल्वे लाइन ६२ साली सुरू झाली २३ कोटी रुपये खर्ची घालून ती ६७ सालापर्यंत पूर्ण करण्याची योजना होती, पण ९० कोटी रुपये खर्च होऊनही योजना पूर्ण होऊ शकली नाही. कामाचा वेग *आणि वाढती महागाई याचा मेळ बसत नसल्याने* कोणत्याही योजनाना अर्थ राहिलेला नाही. ही परिस्थिती सवधिताना माहीत नसते असे नव्हे, पण ती सुधारण्यासाठी कोणालाच काहीही करायचे नसते. वर्षाच्या ३६५ दिवसांपैकी १५० दिवस आपण सुट्टयाची मौजमजा लुटतो. जे कामाचे दिवस असतात त्या दिवशीही आपण

सर्व शक्तीनिशी काम करत नाही, तर विविध जाती-जमातीचे समाधान व्हावे म्हणून सुटृयाची खिरापत करण्यात आपण मश्गुल असतो! मग कोणतीही योजना ठरल्या वेळेत पूर्ण होऊ शकत नाही म्हणून आपण बोल तरी कसा आणि कोणाला लावणार ? फर्टिलायझर प्लॅन्टस सर्वसाधारणपणे तीन वर्षांत पूर्ण होतात. आपण मात्र त्यासाठी सात वर्षे घेतली. लोखंडाचे प्रचंड प्रकल्प जपानमध्ये तीन वर्षांत तर कोरियामध्ये दोन वर्षांत उभे राहू शकतात पण पंधरा वर्षे खर्ची घालून आणि कोटयवधी रुपयाची उधळण करूनही आपला बोकारोचा प्रकल्प पूर्ण विकसित होऊ शकत नाही आणि उत्पादनक्षमतेबाबतच्या अपेक्षाही पूर्ण करू शकत नाही.

कोणत्याही पक्षाने निवडणुका जिंकून सत्ता संपादन केली की, सत्ताधारी पक्ष आपण सत्तेवर कसे राहू आणि पुन्हा निवडणुका कशा जिंकू यावरच आपले सारे लक्ष केंद्रित करतो. सत्ताग्रहण केल्या दिवसापासूनच निवडणुकांसाठी फंड उभारण्यास सुरुवात होते. सार्वजनिक मालमत्तेची लोक नासधूस करतात, असे आपण म्हणतो; परंतु प्रत्यक्षात राजकीय पक्षानाच सार्वजनिक मालमत्तेबद्दल जराही तमा नसते. कधी भाषेचा प्रश्न, कधी जातीय तणाव, तर कधी एखादा स्थानिक प्रश्न याचे निमित्त करून राजकीय पक्षच आंदोलन उभे करतात. लोक रस्त्यावर येतात. सार्वजनिक वाहनांची नासधूस होते. रेल्वेगाडया आणि रेल्वेस्थानके यावर हमले होतात. पोस्ट-ऑफिसेसना आगी लावल्या जातात. सार्वजनिक वाहतूक, रेल्वे सुविधा याबाबत गरजेच्या मानाने परिस्थिती निराशाजनक आहे. अशा परिस्थितीत कोणते ना कोणते निमित्त पुढे करून जे आहे त्याची मुक्तपणे नासधूस करण्यात येते. या घटनांची नोंद करून त्यावर भाष्य करताना पै लिहितात : बहुतेक सर्व राजकीय पक्ष गांधीवादी असल्याचा दावा करतात महात्माजींच्या विचारसरणीचा, अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार करतात; परंतु सरकारी इमारती आणि सार्वजनिक मालमत्ता यांच्याबाबतीत अहिंसावादाला निर्लज्जपणे हरताळ फासला जातो. याबाबत लोकाना दोष देण्यात मतलब नाही. आपले राजकीय पक्ष आणि राजकीय नेते यांनीच कोणत्याही आंदोलनाला असे हिंसक स्वरूप देण्याची प्रथा पाडली आहे. जेपींनी उभारलेले बिहारमधील आंदोलन असो की, चेन्ना रेड्डींचे तेलंगणामधील आंदोलन असो, हिंसक स्वरूपात भडका उडाल्याखेरीज कोणत्याही आंदोलनाला तेज येत नाही आणि कोणताही प्रश्न सुटू शकत नाही.

अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रीय प्रश्न सुटणार कसे ? दारिद्र्य दूर होणार कसे ? आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणार कशी ? नियोजनकार राष्ट्रीय उत्पन्नात ३ टक्क्यापेक्षा जास्त वाढ होणार नाही असे म्हणतात; पण हे तीन टक्के तरी आपल्या पदरात कुठे पडतात ? स्वाभाविकपणे ज्याचा अभिमान वाटावा असे काही शिल्लक उरतच नाही. काही कार्य दिसून आले तर भविष्याबाबतच्या आशा पल्लवित होतात. आपला समाज तर वर्तमानकाळाचा हत्यारासारखा वापर करून, भविष्यकाळाची उभारणी करण्याऐवजी, भूतकाळातच मश्गुल झालेला दिसतो. जुनी मंडळी, जुनी यंत्रणा 'आ' वासून उभे असलेले प्रश्न सोडवण्यात निष्क्रिय ठरत असेल तर तरुणानीच पुढाकार घेतला पाहिजे, असे सुचवून पै यांनी आपल्या लेखाचा समारोप केला आहे. □

## □ पुन्हा एकदा महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न

जनगणनेचे काम चालू असताना बॅरिस्टर अंतुले यांनी पुन्हा सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले. महाराष्ट्राच्या कोणत्याही मुख्यमंत्र्याने सीमाप्रश्नाचा उल्लेख केला की, कर्नाटकचे मुख्यमंत्री प्रथम त्याकडे दुर्लक्ष करतात आणि दोन-चार वेळा हा विषय पुढे आला तर महाजन-निवाडयाची अमलबजावणी करा, असे सांगून कर्नाटकचे मुख्यमंत्री हा प्रश्न आपल्यापुरता सोडवून टाकतात. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, मुख्यमंत्रीपदी कोणीही विराजमान झालेले असो, या दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये या प्रश्नाबाबत कधीच एकमत होत नाही आणि ज्याच्यावर हा प्रश्न सोडवण्याची खरी जबाबदारी ते केंद्र सरकार या प्रश्नाबाबत आपली उदासीनता कायम ठेवून राहते. फारच झाले तर संबंधित मुख्यमंत्र्यांनी या विषयावर आपआपसात चर्चा करावी, असे म्हणून केंद्रीय गृहमंत्री या प्रश्नाची वाट लावतात या प्रश्नाच्या सोडवणुकीबाबत वेळेचे कोणतेही बंधन घालून घेण्यास आपण तयार नसल्याचे पंतप्रधानांनी कालपरवाच बोलून दाखवले आहे. तथापि हा प्रश्न अस्तित्वात असल्याचे पंतप्रधान मान्य करतात.

जनगणनेचे कामकाज चालू असतानाच या प्रश्नाला फुंकर घातली गेल्याने भाषावार नोंदणीबाबत आपण पुरेसे बलशाली असावे यासाठी कानडीमंडळी विशेष प्रयत्नशील आहेत. त्यातच दोन्ही मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न उकरून काढल्याने सीमाभागामधील मराठीमंडळीही खडबडून जागी झाली असून, जनगणनेच्या बाबतीत तपशील पुरवताना विशेष दक्षता घेत आहेत या प्रश्नाची सोडवणूक करताना बेळगाव भागात मराठी तसेच कानडी जनतेचे प्रमाण काय पडते ही एक महत्त्वाची बाब ठरणार आहे. अर्थात कर्नाटक शासनाकडून मराठीमंडळीचे पद्धतशीर खच्चीकरण झाले असल्याने १९५१ साली ५१ टक्के असलेले मराठीमंडळींचे आता प्रमाण घसरून ४४ टक्क्यांच्या आसपास आले आहे. बेळगाव व अन्य मराठीमंडळींचे वर्चस्व असलेला भाग महाराष्ट्रात विलीन व्हावा यासाठी लोकशाही मार्गाने जे करता येणे शक्य आहे ते सीमा भागामधील मराठी जनतेने करून दाखवले आहे, पण हा नाजूक प्रश्न काही सुटू शकला नाही. तो लवकर सुटण्याची शक्यताही नाही. तथापि या प्रश्नाबाबत बोलणे निघाले की, सीमाभागामधील मराठीमंडळींच्या आशा पल्लवित होतात. हा प्रश्न धसास लावावा म्हणून झगडणाऱ्या या भागामधील नेतृत्वाची एक पिढी खर्ची पडली तरीही राज्यसरकारकडून होणारे सारे अन्याय सहन करत, सीमाभागामधील मराठी जनता या प्रश्नाच्या सोडवणुकीची उत्सुकतेने वाट पाहात आहे.

या प्रश्नाची चर्चा सुरू होताच शिवसेना मैदानात उतरली. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या सहकार्याने मुंबईत एक प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात आला. थिजून ठप्प झालेल्या या प्रश्नाची खपली निघाली तर जनमत या प्रश्नाबाबत किती संवेदनाक्षम आहे, याची चुणुक या मोर्चाला जो प्रतिसाद मिळाला त्यावरून दिसून आली. एक लाखाच्या या प्रचंड मोर्चाचे मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. अंतुलेसाहेबांनी या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी, विशाल गोमांतकचा पर्याय

आपल्याला मान्य असल्याचे सांगून एक दणका ठेऊन दिला. तथापि दुसऱ्या दिवशी त्यानी लगेच खुलासा करून आपण असे काहीही बोललो नसल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, 'खेडे हा घटक आणि भौगोलिक सलगता, याचबरोबर, सीमाभागामधील जनमत ही गोष्टही या प्रश्नाची सोडवणूक करताना विचारात घेतली पाहिजे.' सीमाप्रश्नाबाबतचा अतुलेसाहेबाचा व्यासंग दांडगा आहे. या प्रश्नाचा परिपूर्ण अभ्यास त्यानी केला असल्याने त्यानी काही पर्याय सुचवला तर तो निश्चितपणे अर्थपूर्ण असेल असे वाटते. या प्रश्नाबाबत विरोधी पक्षाशी स्वतःला अथवा स्वतःच्या पक्षाला बांधून घेण्यास मुख्यमंत्री तयार नाहीत. विशाल गोमंतकचा तोडगा आपण सुचवला नसल्याचा खुलासा मुख्यमंत्र्यानी केला, त्याचवेळी त्यानी हेही स्पष्ट केले की, एखादा तोडगा विरोधी पक्षाना मान्य नसेल याचा अर्थ तो आम्हालाही मान्य नाही, असे समजण्याचे काहीएक कारण नाही.

शिवसेनेने या प्रश्नाबाबत काढलेल्या मोर्चाचे सभेत रूपांतर झाल्यावर तमाम राजकीय पक्षानी या व्यासपीठाचा मुक्तपणे वापर केला आणि १ मेपूर्वी हा प्रश्न सोडवण्यात यावा, अशी मागणी केली. सभा संपवून परतणाऱ्या जमावाने उदंड गुंडगिरी आणि लुटालूट केली. शासनाने चौकशीची मागणी मान्य केली असली तरी या दंगलीबाबत फारसे काही होणार नाही

महाजन समितीचा अहवाल निवाडा समजून तो जसाच्या तसा अमलात आणा, अशी मागणी कर्नाटक विधानसभेने दोन वेळा केली असली तरी हा निवाडा आपल्याला सोइस्कर नाही याची गुंडूराव याना जाणीव आहे. तथापि महाजन समितीने बेळगावबाबत महाराष्ट्रावर अन्याय केल्याने महाराष्ट्र शासन आणि इतर विरोधी पक्ष यांच्या दृष्टीने हा अहवाल कस्पटासमान आहे. बेळगावचे दान जर महाराष्ट्राच्या बाजूने पडले असते तर महाराष्ट्राने हा अहवाल तडजोड म्हणून तरी जरूर मान्य केला असता. महाजन अहवालाप्रमाणे बेळगाव महाराष्ट्राला मिळत नसले तरी तिन्ही बाजूनी महाराष्ट्राच्या सीमा बेळगावपासून केवळ पाच मैलपर्यंत जाऊन भिडतात. पूर्वेकडील एक बाजू फक्त कर्नाटकाला मोकळी मिळते. आज महाराष्ट्राची सीमा बेळगावपासून पंचेचाळीस मैलावर तुटते. महाजन अहवाल मान्य होवो अथवा अन्य काही मार्गाने या प्रश्नाची सोडवणूक होवो, जेव्हा केव्हा हा प्रश्न सुटल तेव्हा बेळगावपर्यंत महाराष्ट्राच्या सीमा भिडलेल्या असतील. 'बेळगाव' हा मात्र दोन्ही राज्याच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. खेरीज दोन्ही बाजूचे जनमतही या प्रश्नाबाबत विलक्षण संवेदनाक्षम आहे. त्यामुळे बेळगावबाबत काही अंतिम निर्णय घेतला तर दंगली उफाळण्याचा संभव असल्याने, आहे हेच उत्तम चालले आहे अशा भावनेने या प्रश्नाकडे बघितले जात आहे. कर्नाटकला ही परिस्थिती अनुकूल असली तरी जसे थे परिस्थिती महाराष्ट्राला अवघड जाईल आणि जितके दिवस जातील तितका गुंता वाढत जाईल. या प्रश्नाची शक्य तितक्या लवकर सोडवणूक होणे सर्वांच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या हिताचे आहे. ◻

## ◻ अटलजी विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय

दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये अलीकडेच एक प्रश्नपत्रिका प्रसृत करण्यात आली होती. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ माम कम्युनिकेशन या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांची विचारदिशा समजावून घेण्याच्या दृष्टीने ही चाचपणी करण्यात आली होती. या प्रश्नावलीमध्ये तुमची सर्वात आवडती व्यक्ती कोण ? आणि तीच व्यक्ती तुम्हाला का आवडते ? असे दोन प्रश्न होते. प्रामुख्याने चित्रपटक्षेत्रामधील आणि क्रीडाक्षेत्रामधील व्यक्तींची निवड केली जाईल असा संयोजकाचा अंदाज होता अमिताभ बच्चन, सुनिल गावसकर, संदीप पाटील आदी मंडळींपैकी कोणाची तरी वर्णी लागेल अशी अपेक्षा होती; पण विद्यार्थ्यांना राजकारणात विशेष गोडी असल्याचे या चाचपणीमध्ये विद्यार्थ्यांनी जी निवड केली त्यावरून दिसून येते. कदाचित राजकारण जेथून खेळवले जाते, त्या दिल्लीमध्ये ही चाचपणी घेतली गेल्याने अशी निवड झाली असावी. सर्वांत जास्त विद्यार्थ्यांनी अटलबिहारी बाजपेयी यांची सर्वांत आवडती व्यक्ती म्हणून निवड केली आहे. विजय जॉली नावाचा विद्यार्थी आपण वाजपेयी यांची निवड का केली याचे कारण देताना लिहितो . 'जनता सरकारमध्ये असताना परराष्ट्रमंत्री म्हणून त्यानी उत्कृष्ट कामगिरी बजावली असून माझ्या मते आज ते देशामधील सर्वोत्तम वक्ते आहेत. व्यक्तिगत पातळीवर त्याना जनतेचा फार मोठा पाठिंबा आहे '

या चाचपणीचा तपशील– हिंदुस्थान टाइम्समार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'वीक–एंड' या साप्ताहिकामध्ये प्रसिद्ध झाला आहे हिंदी घेऊन एम. ए.चा अभ्यास करणारा राजेश माथूर म्हणतो की– वाजपेयी हे एकमेव वलयांकित नेतृत्व आहे. त्यांच्या पक्षाची विचारसरणी मला पटत नसली तरीही देशामधील एकमेव सच्चा नेता म्हणून मी अटलजीकडे पाहतो आणि त्याच दृष्टीने मी त्यांची निवड केली आहे. अटलजींची निवड करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या व्यासंगी आणि तरीही सर्वसामान्याना सहज समजू शकेल अशा पद्धतीने भाषण करण्याच्या शैलीचा आवर्जून उल्लेख केला आहे.

लोकप्रियतेच्या चाचपणीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहेत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी. इंदिराजींची निवड करणारी मृदुला चोपडा ही श्रीराम महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी म्हणते : जनता राजवटीने इंदिराजींच्या हाती मोडकळून गेलेली राजवट सोपवली. त्यांच्या परीने त्या झटून प्रयत्न करत आहेत आणि त्यांच्या नेतृत्वाची सध्या देशाला इतकी गरज आहे की त्या नसत्या तर अराजक निर्माण झाले असते. अशा कठीण काळी त्या समर्थ नेतृत्व देऊ शकतात म्हणूनच मी त्यांची निवड करते. संजयचा मृत्यू हो त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यामधील फार मोठी दुर्घटना ! त्या प्रसंगी त्यानी जे धीरोदात्त वर्तन ठेवले त्याचीही अनेकाकडून तारीफ झाली असून त्यांची निवड करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनोधैर्याचे मनमोकळे कौतुक केले आहे. कायद्याचे शिक्षण घेणारा अमिया गांगुली म्हणतो : देशामधील एकता टिकवून धरून, समोर असलेल्या असंख्य प्रश्नाना तोंड देण्याची कुवत असलेल्या त्या एकमेव व्यक्ती असल्याने मी त्यांची निवड करतो.

या दोघाखेरीज, मोरारजीभाई आणि जनता पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्या पाठिराख्यांची संख्याही बऱ्यापैकी आहे. खेरीज काही विद्यार्थ्यांनी, अपेक्षेप्रमाणे अमिताभ बच्चनची निवड केली आहे. खेळापैकी क्रिकेट लोकप्रिय असले तरी आता सुनिल गावसकरच्या जागी संदीप पाटील आलेला दिसतो. इतर क्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींपैकी मदर टेरेसा आणि आचार्य रजनीश यांचाही काही विद्यार्थ्यांनी सर्वांत आवडती व्यक्ती म्हणून उल्लेख केला आहे. रजनीश यांची निवड का केली याचे स्पष्टीकरण देताना एकाने लिहिले आहे : अंधश्रद्धा आणि ढोंगीपणा यानी बुरसटून गेलेल्या समाजाची कानउघाडणी करण्याची धमक दाखवल्याबद्दल मी त्यांची निवड केली आहे. ◻

## गुजराथच्या मेडिकल विद्यार्थ्यांचे आंदोलन

# दादुमियांच्या डायरीतील आणखी काही पाने

[ २८ डिसेंबर १९८० ते १५ फेब्रुवारी १९८१ या कालावधीतील पाने गेल्या अंकात दिली होती. हा पुढचा हप्ता ]

### सतरा फेब्रुवारी १९८१

गांधीनगरास जायचे म्हणजे कटकट आहे.

शनि-रवि जाता येत नाही, कोणी भेटत नाही. चालू दिवशी प्रॅक्टिस बुडवून जावे लागते. पेट्रोलचा खर्च आणि हायवेवर ड्रायव्हिंग करून जायचे म्हणजे टेन्शन, कटकट. नेतेलोक ओळखीचे आहेत म्हणून बरे आहे, टेलिफोनवरून तुमच्याकडेच उतरायला येत आहोत असे हक्काने सांगता येते. त्याचाच टेलिफोन वापरून अपॉइंटमेंटस् मिळतात. इतरांना आठवडा आठवडा थाबावे लागते.

दोन दिवस गाधीनगरास जायचे म्हणजे खूप नुकसान होते.

पण आपल्या तरुण पिढीसाठी हे नुकसान सहन करावे लागते.

पुण्याचे एक विद्वान घरी येऊन बसले होते. गांधीनगरास मी गेलो होतो याविषयी त्याच्या मनात खूप उत्कंठा होती. विशेषतः या 'हॉट्' विषयासाठी मी डेप्युटेशन घेऊन गेलो होतो हे त्याना कळल्यामुळे–

'दादूमिया, तुम्ही गाधीनगरास जाऊन आलात, तेथे काय झाले? तुमच्याबरोबर पोरेदेखील होती!' त्यानी विचारले.

'तुम्हाला कसे उत्तर पाहिजे आहे?'

'अरे यार, मला सत्य जाणून घ्यायचे आहे.'

'मग ते पचवून घ्यावयाची मनाची तयारी आहे ना?'

'हो, काहीही सागितलेत तरी ऐकून घेईन.'

'ही पोरे महाभयंकर आहेत. एकदम सत्य बोलणारी, स्पष्ट बोलणारी. कोणाच्याही बापास न भिणारी आणि बापास बाप न म्हणणारी. त्याना आवरता आवरता मोठी फें फे उडून गेली आमच्या ज्येष्ठ लोकाची.'

'म्हणजे?'

'इदिरा गाधीकडे जायचे व त्याना त्याच्या तोडावर त्या कशा आहेत ते ऐकवायचे. फक्त पोरेच हे काम करू शकतात, इतराची ही हिम्मत नाही. एकदा चर्चा सुरू झाली की, आपण मध्ये चुकून वा बुद्धया बोललो तर आपलाही अपमान करण्यास ही मंडळी चुकत नाहीत.'

'त्यात बिघडले कोठे?'

'राजकारणी मंडळीना सुनवायची कोणाची हिंमत होत नाही. या तरुण मंडळीना भीती नसते. आमचे वाईट होऊन राहिलेच आहे, किती वाईट करणार आहात, करा, हे त्याचे तत्त्वज्ञान. नंगेसे खुदा भी डरता है. राजकारणी लोक चळाचळा कापतात या विद्यार्थ्यांना.'

'उदाहरण द्या.'

'तुम्ही महाराष्ट्राचे. मी महाराष्ट्राची उदाहरणे दिली तर तुम्हाला बरोबर समजेल. मी शक्यतो तुम्हाला समजेल अशी उदाहरणे देण्याचा प्रयत्न करतो. तरीही ते बरोबर जमणार नाही.'

'का?'

'कारण गुजराथ व महाराष्ट्र यात मोठा फरक आहे. आमच्याकडे मराठा व ब्राह्मण हा वाद नाही गुजराथमध्ये. तेथे तो वाद असल्यामुळे तेथे काही बोलले तर त्याला निराळा रंग येऊ शकतो. मराठा व दलित एकत्र येऊन ब्राह्मणास खाली पाडण्याचा प्रयत्न करतात तसा प्रश्न सुदैवाने येथे नाही.'

'पण उदाहरण तर द्या.'

'मुलाना डायरेक्ट राजकारण्यांशी बोलायला सधी देणे म्हणजे त्यांची वस्त्रे उतरविणे होय. राजकारण्यांची जराही भीती वाटत नाही त्याना.'

'पण उदाहरणे तर द्या.'

'समजा, अंतुल्यांशी चर्चा चालली आहे. गवई अंतुल्यांच्या शेजारी बसले आहेत. गवई मुलाना काही समजावण्यासाठी पुढे सरसावले तर मुले विचारतील, गवईसाहेब, आम्हाला आंबेडकर चालतील, गवई नाहीत. या मुद्द्यावर तुम्हाला जास्त ऐकायचे आहे? खिलाडू वृत्तीने समजा गवई 'हो' म्हणाले तर आबेडकरानी केले नसते अशी भली लंबीचवडी लिस्ट पोरांनी त्यांना सादर केली तर गवईंची व या पोराबरोबर असणाऱ्या आमच्यासारख्या ज्येष्ठ मंडळीची स्थिती काय होईल ते तुम्हीच सांगा.'

'लक्षात आले मला.'

'आणि मुलाचे मुद्दे खोडून काढणे अवघड जाते. समजा, नानासाहेब गोऱ्यानी त्याच्या समाजवादी पद्धतीप्रमाणे सामाजिक न्याय वगैरे भाषा चालू केली तर ही पोरे सरळ नानासाहेबाना विचारणार, नानासाहेब, मग नातेवाईक आज अमेरिकेत का? का तुमचा डॉक्टर जावई झोपडपट्टीत शोषित-दलिताची सेवा करीत नाही भारतात? सोडा, आम्ही तुमच्या पुढारीपणास आव्हान देत नाही; पण कशाला उगाच बोलायला लावता? समजा, या मुलांबरोबर तुम्ही ज्येष्ठ

किंवा वडील आहात. तुमची स्थिती कशी नाजूक होईल ? आणि आपल्या राजकीय नेत्याना इतके स्पष्ट ऐकून घ्यायची सवय नाही. ते लगेच गरम होतात आणि माणूस गरम झाला की तो रागावतो व वड्याचे तेल वाग्यावर निघते. आमची बोलणी 'फेल' जाणार हे लगेच आमच्या लक्षात आले.'

'हे भलतेच इंटरेस्टिंग आहे.'

'हे चक्र दुसऱ्यांना जोवर कापते तोवर इंटरेस्टिंग वाटते. पोरांजवळ सर्वांचा बायोडेटा पाठ आहे. बोलत नाहीत म्हणून. मला वाटत होते, त्याना समजत नाही; पण आता कळले, सारे समजते. जाणूनबुजून बोलत नाहीत आणि त्यानी तोंड उघडले तर भडका होईल भडका.'

'दोन-चार उदाहरणे तर द्या'

'समजा, वसंतराव नाइकाची व याची चर्चा सुरू आहे. वसंतरावानी त्याच्यावर गुगली बॉल टाकला विकेट घेण्यासाठी. हे पठ्ठे डरत नाहीत. ते सांगतात, वसंतराव, चुका कोणाच्या होत नाहीत ? आपण आज मुख्यमंत्री आहात; पण अमुक वर्षी आपल्या हातून चूक झालीच ना ? आम्ही मेडिकलचे विद्यार्थी. ती चूक ज्यानी निस्तरली ते आमचे मास्तर. ते आम्हास खोटे सागणार नाहीत. हा, ते प्रेसला किंवा बाहेरच्या जगाला सांगायला जाणार नाहीत; पण चार भिंतीत आमच्याशी निश्चित खरे बोलणार. त्यानी लफडे कसे निस्तरले ते सविस्तर सांगितले आहे आम्हास. तुम्हास कोणी कोणी मदत केली आहे ते ऐकायचे आहे ? पोस्ट मार्टम रिपोर्ट कोणी कसा बदलला, अमक्या डॉक्टरला किती पैसे दिले—जुन्या आठवणीना उजळा द्यायचा असेल तर आम्ही सविस्तर सांगू, पण तो आजचा चर्चेचा विषय नाही.'

'श्:', माझे महाराष्ट्रातील पाव्हणे कपाळावरील घाम पुसत म्हणाले, 'पण दादूमिया, वसंतराव नाइकाची यावर प्रतिक्रिया काय ?'

'कसली कपाळाची प्रतिक्रिया ! घाम सुटतो त्यांना व ही पीडा लवकर बाहेर जाईल तर बरी असे त्याना होऊन जाते. आणखी एक उदाहरण देऊ ?'

'द्या, द्या !'

'समजा, तुमचे शंकरराव खरात 'बुद्धी काय तुमचीच मक्तेदारी आहे काय' वगैरे म्हणू लागले तर ही पोरे त्याना विचारणार, तुमचे डॉक्टर कोण ? ते सवर्ण का ? अवर्ण का नाही ? तुमचे वकील हेच का, ते का नाहीत ? अशा प्रश्नाना उत्तरे देणे अवघड आहे. पायलटाना राखीव जागा तुम्ही दलिताना का देत नाही ? कारण, तुम्हाला तेथे तुमच्या प्राणाची भीती वाटते म्हणून, बस्स, आमचे आर्ग्युमेंट हेच आहे. एम. डी. किंवा एम. एस. डॉक्टर होण्यासाठी कसली राखीव जागा ? तेथे समाजाच्या प्राणांशी गाठ आहे. इमर्जन्सीत निर्णय घ्यायच्या वेळी तो निर्णय अचूक असावा लागतो. तेथे बुद्धीशी संबंध येतो.'

'और काम आहे.'

'मीही तुम्हाला समजतील अशी महाराष्ट्राची उदाहरणे दिली. आमच्या पोरानी गुजराथच्या नेत्याची जी अवस्था करून सोडली त्याचे वर्णन मी काय करू ? त्या सोहळ्यास मी साक्षी होतो, नव्हे, आय वॉज इनव्हॉल्व्हड. ही नेतेमंडळी भडकून गेली होती आणि त्याच्याजवळ काहीच उत्तर नव्हते संपूर्ण नागडे केल्यावर, तेही त्याच्या सचिवासमोर ! त्या वेळी मला वाटले, मजजवळ मायक्रोकॉर्डर म्हणजे मिनी टेपरेकार्डर पाहिजे होता. मी दुष्मनीच जणू विकत घेत होतो. काय सांगू ?'

'तुम्हाला पोराविषयी काय वाटले ?'

'खरं सांगू, अभिमान ! जे आम्हाला जमू शकत नाही ते काम कोणी केले तर त्यांच्याविषयी आदरच वाटणार ना ?'

'आणि तुमच्याविषयी ?'

'लाज !'

'बापरे !'

'नाही तर काय वाटणार ? तेव्हा माझ्या मनात एक कल्पना चमकून गेली. यू कॅन कॉल दादूमियाज लॉ.'

'कसला लॉ ?'

'तरुणाचा राजकारणात तुम्ही वापर करू शकता प्रस्थापिताना हुलविण्यासाठी. ते स्पष्ट बोलू शकतात, निर्भीड असतात व त्याची अपेक्षा फार मोठी नसते. मग ते सत्ताधीश होतात. त्याची महत्त्वाकांक्षा वाढते. ते प्रस्थापित होतात. त्याचे वस्त्रहरण करण्यासाठी पुन्हा आणखी तरुण रक्त. ही प्रक्रिया चालत रहाते आणि या प्रक्रियेत तरुण रक्तास वाव मिळतो व प्रस्थापिताची मक्तेदारी खलास होते.'

'चांगला आहे लॉ !'

---

## अठरा फेब्रुवारी

---

बडोदे आता शांत झाले आहे

कर्फ्यू जवळजवळ नाहीच

अजून रात्री भरवसा देता येत नाही लुटालूट होईल म्हणून रात्रीचा कर्फ्यू आठवडाभर ठेवू, असे कलेक्टर म्हणाले. पोलीस सुपरिंटेंडेंटदेखील आता परिस्थिती काबूत आली आहे अशी माहिती देतात. बडोद्यात तीन दिवस फायरिंग झाले, पंचवीस फैरी झाल्या तरी एक का दोनच लोक मेले याच्याउलट, आणंद येथे दोन फैरी गोळीबारात तीन लोक ठार झाले, असे खास वृत्त पोलीस सुपरिंटेंडेंट सांगतात. याचा अर्थ काय ?

तेथील मुले जास्त तोफानी आहेत काय ? का तेथील पोलीस जास्त क्रूर ? पोलीस नाही आर्मी.

मला एक आर्मीचे अधिकारी सांगत होते, आम्हाला बोलावतात, याचा अर्थ काय ? पोलीस फेल् गेले आहेत म्हणून लष्करास आमंत्रण. लाठीकाठी म्हणजे पोलीस, बंदूक-पिस्तूल म्हणजे आम्ही. कॉस्ट बेनिफिट रेशिओ काय सांगतो ? आमच्या गोळ्या फुकट गेल्या नाही पाहिजेत शांतता प्रस्थापित करायची आहे ना ? मग बंदूक चालवावी लागणार ! बंदूक कशासाठी ? भीती निर्माण करण्यासाठी. दरारा निर्माण करण्यासाठी. मुसलमान पूर्वी मुलुख बेचिराख करीत, मंदिरे पाडत, याचा अर्थ काय ? भीतीचे वातावरण निर्माण करणे. १८५७ नंतर इंग्रजानी केवळ संशयामुळे लाखो लोकाना झाडांवर टांगून

लटकावले. ते का ?

मग आणंद येथील आर्मीचे अधिकारी जास्त 'कॉंपिटंट' म्हणावे लागतील. म्हणून, तेथे ताबडतोब शातता प्रस्थापित झाली हे सत्य आहे.

गाधीनगरातील नेत्याच्या पोटातील पाणीही हालत नाही. आपण हे आदोलन मोडून काढू याविषयी त्यांच्या मनात कोणताही वाद नाही. आदोलनास ते डरत नाहीत. एका मंत्र्याने तर सरळ विचारलेच ना, शेतकऱ्यांचे आदोलन आम्ही गाळात काढले, या तुमच्या डॉक्टरांच्या आंदोलनास विचारतो कोण ?

डॉक्टराना मनोहरसिंग जाडेजा या आरोग्यमंत्र्यानी तसे खूप दिले आहे.

इंटरचेंजेबीलिटी निघाली.

कॅरी फॉरवर्ड सिस्टिम काढली.

बाकीच्या मुद्द्यांना नाही म्हटले.

पण जे दिले ते कमी नाही.

याचे श्रेय ?

अर्थात् डॉ. व्यासना.

बोलणी करण्यात यांचा हातखंडा आहे यशस्वी निगोसिएशन्स् ही त्यांची स्पेशालिटी. प्लास्टिक सर्जन असल्यामुळे खूप पेशन्स आहे.

भरपूर पेशन्स आणि कूल नर्व्ह. चटकन् प्रक्षुब्ध होत नाही.

आपण लौकर चिडतो.

समोरचा पक्ष तुम्हास चिडवून गरम करण्यासाठीच जणू टपलेला असतो. तुम्ही गरम झालात की बोलणी फिसकटतात.

म्हणून या वेळी स्ट्रॅटेजी ठरवून टाकली होती.

सुरुवातीची फास्ट बॉलिंग किरीट भट या फास्ट बॉलरला करून द्यायची.

मी डॉ. व्यासच्या शेजारी बसायचे व त्याना मुद्दे पुरवायचे. त्यांनी शांतपणे, स्थिर बुद्धीने गुगली बॉलिंग टाकायची. एक ओव्हर, दुसरी ओव्हर. ओव्हर मागून ओव्हर्स !

किरीट भट डायनामाइटवाला. चटकन् पेटणारा. त्याला काबूत ठेवणे म्हणजे महाकर्मकठीण ! थाब म्हणालो तरी त्याने मानले पाहिजे ना ?

जयंत शुक्ल सामाजिक कार्यकर्ते. त्यांचा मुलगा नीलेश तर या पोराचा लीडर. टग्या. एकदम बेछूट. कोणाच्याही बापाला न घाबरणारा, स्वत:च्याच बापाला जेथे विचारीत नाही तेथे इतराच्या बापांचा प्रश्नच नाही. आपल्या पॉलिटेकनिकच्या प्रिन्सिपॉलला त्याने सर्वांच्या देखत सरळ सुनावले, 'ओय, नीट ऐक ! माझे तीन हजार रुपये जे घेतले आहेस ते मला उद्याच्या उद्या परत मिळाले नाहीत तर तू उद्या काही जिवंत रहाणार नाहीस !'

तेथपासून हा नीलेश शुक्ल पोराचा लीडर बनला.

कारण, प्रिन्सिपॉलने घाबरून त्याला पैसे परत दिले.

सरळ डील होते, नो फर्स्ट क्लास, नो थ्री थाउजंड रुपीज.

असा खुल्लखुल्ला नीलेश. जणू जिवंत बॉंबच !

पण त्याने स्वतःहून बाहेर राहण्याचे पसंत केले.

उगाच कटकट नको,

माझ्यामुळे तुमच्या चर्चा; तुमची बोलणी फिसकटली हा उगाच आरोप नको !

त्याचे सासरे प्रा. रेडे.

शिक्षणतज्ज्ञ.

अनुभवी.

बडोदा विद्यापीठाचे सिंडिकेट सदस्य. ट्रेड युनियनिस्ट.

एका बाजूस बाप व एका बाजूस सासरा, तरी नीलेशला चूप बसविणे अवघड होते.

डॉ. शेठ आलाच नाही.

तब्येत बिघडली होती.

जागरण झाले होते.

पण त्याचा भाऊ ज्वलित सेठ आमच्याबरोबर होता. शांत, सभ्य व बराचसा रिझनेबल.

सध्या सर्जरी करतो आहे.

भयंकर स्फोटक मेडिकलच्या तरुण विद्यार्थ्यांत हा बराच सोबर व सरळ वाटला.

आमची चर्चेची तीन राउंड्स् झाली.

हेल्थमिनिस्टर दादू आहे.

राजकोटचा महाराजा.

स्वत: एपिलेप्सीचा पेशंट.

एकदम खानदान ! 'आप'शिवाय बात नाही. विषयाचा सखोल अभ्यास.

वेळेवर बंधन नाही. आरामात बोला–

जिभेवर पूर्ण ताबा.

छान व्यक्तिमत्त्व !

अशा या मनोहरसिंग जाडेजा यांच्याशी चर्चामसलती करण्यात मजा आली.

आमची बोलणी समाधानकारक झाली. बडोद्यातील हिंसा बंद झाली पाहिजे, आमच्या डॉक्टरलोकांचे नाव जे खराब होत आहे ते बंद झाले पाहिजे, म्हणून आम्ही वडीलमंडळी आलो आहोत. या मुलाच्या भवितव्याची आम्हाला खूप चिंता वाटते, ही आमची भूमिका मनोहरसिंग जाडेजा खूप छानदारपणाने समजावून घेतात.

आमची बोलणी खेळीमेळीची व समाधानकारक पार पडतात.

अर्थमंत्री आमचे जुने मित्र. त्यांच्या घरी आमच्या मंडळातील अकरा सदस्यांना गरमागरम बटाटेपोहे दिले जातात. अर्थमंत्री आज मूडमध्ये दिसतात. उद्या बजेट मांडणार विधानसभेत. खरे म्हणजे आजच माडणार होते ! पण कोणी तरी गेल्यामुळे शोक पाळणार आहेत सारे सदस्य; प्रश्नोत्तरी होणार होती या दग्याच्या प्रश्नावरून, पण तीदेखील आता होणार नाही. कॉंग्रेस आयवाले म्हणतात, बरे झाले, पथ्यावर पडले मरण ! एक दिवस डोक्याला शीण कमी !

आम्ही घरी परत येतो.

थकलेले, मरगळलेले.

बडोदे जवळ दिसू लागल्यावर गाडीत मी म्हणतो, 'आजनी क्रेडिट, भास्करभाई, बद्धी तमने मळवी जोइए !'

डॉ. व्यास म्हणतात, 'ठीक मारा भाई, विद्यार्थ्यांसाठी एवढं करायचंच असं नक्की केलं होतं, ते पार पडलं. खूप समाधान वाटत आहे !'

'मला तुमच्या निगोसिएशन पॉवर्सचे कौतुक वाटतंय. मी या आंदोलनावर लिहिणार आहे. यावर देखील चार ओळी लिहिण्याचा विचार आहे. हे तंत्र कसे पर्फेक्ट केले तुम्ही ?'

'तुमच्याकडून 'किसिंजर पेपर्स' नेले होते ना, त्याने माझ्या ज्ञानात खूप भर पडली. निक्सनसाठी किसिंजरने चिनी अधिकाऱ्याशी व सत्ताधीशाशी कशी व किती वेळा चिकाटीने चर्चा केली व नंतर निक्सन–चाऊ भेट घडवून आणवून साऱ्या जगाचा इतिहास पालटवून टाकला ती सारी पाने मला फार फार आवडली !'

'किसिंजरची भारतभेट व भारत–पाक १९७१ चे युद्ध, तेही प्रकरण छान आहे.'

'त्याचप्रमाणे मी गांधीजोंच्या चरित्राचा खूप अभ्यास केला आहे. या शतकात ज्यानी ज्यानी राजकीय चर्चामसलती केल्या त्यात गांधीजींचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. त्यांच्याएवढ्या चर्चा–मसलती या शतकात दुसऱ्या कोणीही केल्या नाहीत. त्यांनीही जगाचा इतिहास बदलला. या चर्चेत गांधीजी एका बाजूला व सारी साम्राज्यशाही दुसऱ्या बाजूला असा प्रकार घडे !'

'गांधीजी अॅज ए निगोशिएटर, तुम्हाला काय आढळले ?'

'समोरच्या पक्षाच्या अडचणी काय आहेत हे गांधीजी आधी समजवून घेत व त्याप्रमाणे वागत. त्यामुळे विरोधी पक्षाचीही त्यांच्यावर विश्वास बसे. हा माणूस माझे भले सोडा, पण नुकसान करणार नाही एवढा विश्वास त्यांनी जरूर संपादन केला होता. त्यांच्याउलट सुभाषचंद्र बोस ! ते एकांतिक होते, फटकळ होते. आपलाच विजय झाला पाहिजे अशा मताचे ते होते. अर्थात् महात्माजींना त्यामुळे बऱ्याच जणांचे गैरसमज सहन करावे लागले !'

'आपल्याला 'सरकारके दलाल' म्हणून ऐकावे लागलेच ना ?'

'त्याची पर्वा नाही ! विद्यार्थ्यांचे, समाजाचे व बडोदे शहराचे भले होत असेल तर आपल्याला कोण काय शिव्या देते त्याची पर्वा नाही !'

'पण इमेज ?'

'ठीक, अशा आंदोलनात इमेज तेवढी महत्त्वाची नसते.'

'यश मिळाले तर इमेज वाढते, असंच ना ?'

'जराही नाही. उलट निगोसिएशन करणाऱ्याने यश–केंद्रित नसले पाहिजे, स्थितप्रज्ञ असले पाहिजे, मारु शू एमा, असे तत्त्वज्ञान असले तरच चांगल्या रीतीने वकिली करता येते. एकदा तुम्ही यश मिळवायचे म्हणून कॉन्शस झालात की तुमचे कॉम्पिटन्स अर्धे खलास होते, सारी तुमची विधाने, तर्क एकाच दिशेने वाटचाल करतात आणि तुमची इंटरप्रिटेशन करण्याची शक्ती लुळी होते.'

'बघू या, पुढच्या निगोसिएशनच्या वेळी. कारण असे प्रसंग वारंवार येतात. पण हे कितपत खरे ?'

'काय ?'

'माझे ट्रेड युनियनिस्ट मित्र सांगतात, निगोसिएशन्सच्या वेळी पाठीमागे एक लहानसा दरवाजा नेहमी उघडा पाहिजे, पळून जाण्यासाठी !'

'फेस सेव्हिंगसाठी, आणि नेत्यांना ते आवश्यक असते. आपण काही तरी केले आहे असे नाटक नेत्यांना दाखविणे आवश्यक असते; पण आपल्यासारख्यांना तसे करायची काय जरूर? आपण शुद्ध मध्यस्थी करणारे लोक ! आपला या सर्व प्रकरणात फायदा काय ? शून्य ! उलट, आपले पेट्रोल, आपला वेळ व आपली शक्ती !'

'खरं आहे, हे मुद्दे मी लिहिणार आहे !'

'खुशाल !'

## एकोणीस फेब्रुवारी

काल रात्री मेडिकलची पोरे व ज्युनिअर डॉक्टर्स सार्वजनिकपणे उपास करीत होते. कर्फ्यू आहे म्हणून तुम्ही घरी जा, असे पोलिसांनी त्यांना फर्मावले. त्यांनी नकार दिला. म्हणून त्यांच्यावर कर्फ्यूचा भंग केल्याबद्दल खटला भरला गेला.

जज्जाने त्यांना विचारले, 'तुम्हाला लीडर व्हायचे आहे का ?–'

''आम्हाला लीडर व्हायचे आहे !' सारे म्हणाले.

'मग तुम्ही जामिनावर सुटू नका, तुम्ही जेलात जा !'

मुले तयार झाली.

त्यांना जेलात धाडण्यात आले.

त्यांचे पालक बिचारे घाबरून गेले. सारखे आमच्या युनियनच्या सेक्रेटरीकडे फोन्स.

सेक्रेटरी व प्रेसिडेंट जेलात गेले. मुले बिचारी गरीब गायीसारखी झाली होती. एका रात्रीत सरळ झाली होती. 'कसेही करून आम्हाला सोडवा, ही जेलमधली भाकरी पहा !' त्यांनी आमच्या मेडिकल युनियनच्या सेक्रेटरीची करुणा भाकली.

मुलांना जज्जने सोडून दिले.

पण पोलीस खटपाळ !

बारा वाजता त्यांना जेलात आणले. बारा ते चार जेलरची आरामाची वेळ. सारे जेलचे काम त्या काळात बंद ! पोलिसांनी जेलात या पोरांना आत आणताच जेलचे दरवाजे बंद झाले.

पुन्हा धावपळ.

सेक्रेटरीस बोलावण्यात आले.

त्याने जेलरच्या आरामाचा भंग करून पोरांना सोडविले.

आठ पोरे व इतर चार डॉक्टर्स अशी बारा मंडळी एका अॅम्बेसेडरमध्ये गच्च भरून जेलाबाहेर पडली. एका इ. एन. टी. सर्जनने हृषा आठही पोरांना जेवायला घातले. याचे कारण त्याचाही पोरगा या आठात होता.

या पोरांकडे बघून एक राजकीय कार्यकर्ते म्हणाले, 'ही का पोरे आंदोलन चालविणार पुढे ? धी देखा लेकिन बडगा नही देखा !'

गावातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांच्या सोटघा आपण खाल्ल्या आहेत. विशेषतः रायटर या अधिकाऱ्याच्या. आपण मंत्री झालो तेव्हा हे रायटरसाहेब या मंत्रिमहाशयाकडे येण्यास डरत होते, अशी माहिती या नेत्याने मला पुरविली.

आपली सर्व डॉक्टरमंडळी सधन वर्गातून येतात. या नव्या पिढीची धोरणे व जीवनशैली बदलली आहे. मऊ, मऊ गाद्यागिरद्यावर ही पोरे वाढतात, गोड गोड खातात आणि सारा दिवस बसून राहतात. कष्ट करण्याचे यांना शिक्षण कोणी देतच नाही. त्यामुळे जरा कष्ट करावे लागले तर यांची तब्येत बिघडते.

कमी काम करून जास्त पैसे मिळविण्यासाठी ही पोरे स्पेशालिस्ट होतात !

पूर्वी गरिबांची सेवा, समाजकार्य वगैरे दृष्टिकोण डॉक्टरात असे. आता त्याचा लोप होत आहे. सरकार सारा पैसा गरिबांसाठी तर खर्च करीत असते; सरकारला कर देऊन आम्ही तर पैसे पुरवितो. आता आणखी कशाला वेगळी गरिबाची सेवा करायची ? इंग्रजांच्या राज्यात इंग्रज सरकार होते. त्याना आमच्या गरिबासाठी काही वाटत नसे. आज सरकार आमचे आहे. सारा पैसा हे सरकार गरिबांच्या तर डोक्यावर थापत असते ! त्यांचे प्रिय मतदार आहेत ना ? मग आम्हास आणखी निराळा त्याग करण्यास का सांगता ?

हा दृष्टिकोण आला आहे तो या सधनतेतून !

सधन झालात की स्वतःच्या शरीराला व बॅंकअकौंटला तोशीश लागेल असे काही करायचे नाही. कसला सोशल कॉन्शसनेस आणि कसली जागृती ?

काम न करता पैसे मिळवायची वृत्ती–त्याला मी बी. सी. मेंटॅलिटी म्हटले. माझ्यावर पालकर कोण रागावले ! ते बॅंकेत काम करतात. संघाच्या सुप्रसिद्ध नाना पालकराचे पुतणे !

माझे म्हणणे खोटे आहे का ते सांगा, तुमच्या बॅंकेत बी. सी. कारकून अधिकाऱ्याची डोकेदुखी बनतो का नाही ते सांगा, मी म्हणालो.

'काम करू नका, पण पैसे जास्त मागा' ही शिकवणूक आपल्या देशात समाजवादी व साम्यवादी ट्रेड युनियस्टांनी आणली. 'त्यांच्यात बी. सी. किती आहेत ?'

'कोणीही नाही !'

'मग उगाच बी. सी.च्या नावाने का खडे फोडता ? बॅंकेत ब्राह्मण कारकूनदेखील कोठे काम करतो ? हे आजचे कल्चर आहे. साडेसहा तासापैकी आमचा कारकून जास्तीत जास्त तीन तास काम करतो. उरलेले साडेतीन तास सरकारला नुकसानच ना ? डॉक्टर्सही कदाचित असेच करीत असतील. ही कॉमन टेन्डन्सी झाली आहे. हे कॉमन कल्चर झाले आहे. बी. सी. असो का ब्राह्मण असो. हे साडेतीन तास साऱ्यांचे गोळा करा म्हणजे एकट्या खात्यात रोज एका बिर्ला किंवा टाटाचे इन्कम तुम्हाला सापडेल !'

'आहे खरे.'

'एकदा आमचे प्राध्यापक आम्हाला मार्क्सिझमचे सिद्धांत शिकवीत होते. मी हात उचावला. हं, पालकर काय अडचण आहे, प्राध्यापकानी विचारले. मी म्हणालो, 'सर, आपण तर मार्क्सच्याही पुढे गेलो आहोत, नाही का ?' त्यांनी विचारले, 'कसं ?' मी उत्तर दिले, 'सर, काम न करता आपले शोषण कसे होत आहे हे आपला कामगार सतत सिद्ध करीत असतो, नाही का ? युरोपियन कामगार निदान आठ तास पूर्णपणे काम तरी करतो !'

'हं–'

'बी. सी. का ब्राह्मण हा भेद या कामाच्या बाबतीत सोडून द्या ! जुने लोक work is worship सारख्या खुळचट कल्पनांनी पछाडल्यामुळे अजून काम करताना दिसतात; पण नवीन लोकांत कोणीही काम करीत नाही व करणारही नाहीत. ते लेटेस्ट कल्चर आहे आणि हे असेच चालणार ! डॉक्टर असो की ड्राफ्टस्मन.'

## चोवीस फेब्रुवारी

हे सरकार लोकांना जाणूनबुजून चिडवीत आहे हे माझ्या समाजशास्त्रज्ञ मित्राचे म्हणणे मला पटले.

या आंदोलनात जेथे हिंसा वा लुटालूट होईल त्या त्या गल्लीत वा विभागात रहाणाऱ्या लोकांवर म्हणे सामुदायिक कर गुजराथ सरकार बसविणार आहे !

विसूकाका म्हणतो, 'सनतभाई तुमचे मित्र आहेत, समाजशास्त्रज्ञ म्हणून सांगतो, त्यांना फोन करून सांगा असा वेडेपणा करू नका ! लोक जास्त भडकतील !'

सनतभाई गुजराथचे अर्थमंत्री. माझे जुने मित्र. गुजराथच्या मंत्रिमंडळात जे अडीच शहाणे आहेत त्यातील ते एक संपूर्ण शहाणे, एकमेव इंटलेक्चुअल ! माधवसिंग सोलंकी अर्धे व मनोहरसिंगजी जाडेजा आणखी एक शहाणे. तिन्ही समाजवादी. माधवसिंग रजपूत लॉबीचे प्रतिनिधी. म्हणून मुख्यमंत्री !

सनतभाईंना मी पत्र लिहिण्याचा विचार करतोय. माझ्या आळीत हिंसाचार झाला तर मी खुषीने असा कर भरेन का ? नाही, मी त्यास विरोधच करेन !

एक पोलीसअधिकारी ट्रीटमेंटसाठी आले होते. त्यांनी मला धक्काच दिला. 'तुम्ही असा कर केव्हापासून भरत आहात ?' ते मला म्हणाले, 'समजा, तुमच्या गल्लीत दंगा झाला; आमचे पोलीस काय करतात ? तुमच्या गाडीवर दंडे मारतात, काचा फोडतात, गाडीचे टेललॅंप्स् फोडतात.'

'पण का ?'

'दोन कारणासाठी. कारच्या काचा कोणी फोडल्या याचा पुरावा नसतो. आमचे पोलीस या दंगा करणाऱ्या पोराचा आळ घेतात. म्हणजे, आम्हाला त्या पोरांना ठोकून काढण्यासाठी सबळ कारण मिळते आणि दुसरे कारण तुमचे असे नुकसान होऊ लागले की आपोआप तुम्ही या पोरांना गाठता व दम देता. आमच्यापेक्षा तुम्ही दम दिलात तर ही पोरे तुमचे म्हणणे ऐकतात. आमचे कोणी ऐकत नाही ! वुई हॅव्ह लॉस्ट अवर क्रेडिबिलिटी.'

'तुम्ही हे सांगता ?'

'हे चोर राजकारणी ! सतत पोलिसांविरुद्ध प्रचार केला आहे या चोरांनी. का म्हणून ठेवावा जनतेने आमच्यावर विश्वास ? १९५७ च्या पूर्वी आम्ही ब्रिटिशांचे हस्तक होतो. त्यानंतर काँग्रेसचे हस्तक झालो. सतत आमच्याविरुद्ध छळ, दमन, अत्याचार, डोळे फोडणे व आता बलात्कार !'

'पण खोटं आहे थोडंच ?'

'एखाद्या मुलास सारखे तू वाईट आहेस, तू वाईट आहेस, असे म्हटले तर त्याची प्रतिक्रिया काय होईल ? आमचे पोलीस समाजाच्या खालच्या थरातून येतात, सुरवातीला गुन्हेगारांना अगदी छान पकडतात, सुंदर रेकॉर्डस् बनवितात. दुसऱ्या दिवशी त्यांना भोवळ येते. त्या गुन्हेगारास सोडून दिलेले असते. कोणा पुढाऱ्याचा फोन आलेला असतो. पी. एस. आय जास्त व्यवहारी असतो. राजकीय दबावापुढे

आपले चालणार नाही, हे सत्य तो नीट ओळखून असतो. असे ४–५ वेळा घडले की हा नवा पोलीस शहाणा होत नाही, दीडशहाणा होतो ! पैसे खाऊ लागतो. लोकाना त्रास देऊ लागतो. छळू लागतो. स्त्रियाची इज्जत घेऊ लागतो. त्यातून आज-कालच्या नव्या कायद्यामुळे अमुक वर्गास काही हात लावता येत नाही. सरळ दिल्लीला त्याचे अर्ज ! एक तक्रार मकवानाकडे व दुसरी जगजीवनरामाकडे ! सारख्या धमक्या देतो, मी उद्या तुझा साहेब होणार आहे म्हणून. म्हणजे आधी ऐकत नाही व साहेब झाल्यावर तर नाहीच नाही. कामाच्या नावाने पूज्य ! आमच्या पोलिसात आज–काल नैराश्य पसरले आहे. तुम्ही जे दुर्वर्तन म्हणता ते या नैराश्यातून आले आहे. खरं सागू, या मेडिकलच्या विद्यार्थ्यांना आमचा पाठिंबा आहे !'

'काय म्हणता ?'

'कारण आमच्या मनात जे आहे त्याच कामासाठी, म्हणजे आमच्यासाठीच ही मुले झगडत आहेत.'

'तरी गोळीबार करता ?'

'गृहमंत्रालयाचा हुकुम आहे, साहेब ! पोटासाठी लाचार आहोत आम्ही. नाइलाज आहे. ही मेडिकलची पोरे चागली आहेत, हुषार आहेत, उद्या आम्हाला ट्रीटमेंटसाठी त्याच्याकडेच जावे लागणार आहे!'

मी शातपणे सुस्कारा सोडतो.

'कोणापाशी खरं बोलायचीही आम्हाला सोय नाही. या राजकारणी नेत्याचे आपापसातील झगडे असे रस्त्यात सोडविले जात आहेत. खरे म्हणजे त्यानाच धरून ठोकले पाहिजेत !'

¤

याच अधिकाऱ्याचा दुपारी चार वाजता फोन येतो. 'साहेब, टाइम्सचे पहिले पान पहा. फोटोखालचा मजकूर वाचा !'

टेलिफोन बद होतो.

मी घाईघाईने टाइम्स उघडतो.

फोटोखाली जाड ठशाचा मथळा असतो, 'आमदारावर जमावाचा हल्ला !'

काल म्हणजे २३ फेब्रुवारीस अहमदाबादेत जमालपूर विभागात मनुभाई परमार या इंदिरा काग्रेसच्या आमदाराच्या घराभोवती लोकांचा मोठा जमाव जमला व त्यांनी पथ्थरबाजी सुरू केली. जमावास पांगविण्यासाठी पोलिसानी अश्रुधुराची शंभर नळकाडी फोडली !

जमालपूर व काळुपूर विभागात समोरासमोर लोकाच्या जमावानी जळत्या चिंध्या फेकल्या, ॲसिड बल्ब्ज् टाकले व तुबळ युद्ध सुरू झाले.

जमालपूर व काळुपूर !

म्हणजे 'एम' लोकाचे अड्डे !

म्हणजे हे दोन धर्मीयातील युद्ध का सवर्ण—अवर्ण यांच्यातील झगडा ?

का आणखी काही ?

## पंचवीस फेब्रुवारी

काय वैताग आहे ! आमच्या गुजराथ मेडिकल युनियनने साऱ्या गुजराथमधील सर्व खाजगी व सरकारी दवाखाने २६ व २७ फेब्रुवारी म्हणजे दोन दिवस बंद ठेवण्याचा आदेश दिला आहे.

म्हणजे एवढ्यातल्या एवढ्यात दवाखाने बद ठेवण्याचा हा दुसरा आदेश !

या लोकाना दुसरा काही धंदा आहे का नाही ? पेशंटस् आमच्या नावाने बोंब मारतात आणि हैराणदेखील होतात.

या दोन्ही दिवशी अहमदाबादेस आदोलनवाले डॉक्टर्स मणीलाल मॅन्शन या काळुपूर रेल्वेस्टेशनजवळील वास्तूपासून मूक मोर्चा काढतील व हा मोर्चा जयप्रकाश नारायण चौकात येऊन बरखास्त होईल !

भारतीय दलित पँथर्स, भारतीय डिस्प्रेस्ड क्लासेस लीग व गुजराथ प्रदेश रोहित मडळ या तिन्ही लोकानी मिळून सारा दोष अहमदाबादेतील गुडावर ढकलला आहे !

हा 'गुजराथ बंद'चा आदेश या लोकामुळे आहे हे काय कोणास ठाऊक नाही ? या लोकानी एका डॉक्टरला व्हिजिटला बोलावले व त्यास ठार केले. त्याच्याजवळ तलवारी आहेत, बदुका आहेत. पोलीस व ही मडळी याच्यात आमने–सामने गोळीबार चालतो म्हणून तर आर्मीस बोलावले गेले. कोठून आली ही भयानक शस्त्रे याच्यापाशी ?

हा मकवाणा अहमदाबादेस येऊन या मंडळीना चिथावतो. भाषणे देतो. त्यानेच हट्ट धरला, बी. सी. जेथे जास्त सख्येने रहातात तेथे पोलिसाजवळ शस्त्रे द्यायची नाहीत. हे लोक म्हणे आमचे दलित ठार करतात !

मकवाण्याच्या बायकोस मंत्रिमंडळात यायचे होते. माधवसिंग सोळकीने नाही म्हटले. या घरेलु मामल्यामुळे ही वर्णद्वेषाची आग पसरली. आता तर 'कास्ट वॉर'च चालू आहे अहमदाबाद शहरात !

शहरातून जाणे शक्यच नाही. तुम्हाला पेट्रोल टाकून जाळतात, नाही तर तलवारीने तुमच्या पोटातील कोथळा बाहेर काढतात !

काय करणार तुम्ही सवर्ण ?

भित्रे !

सुशिक्षित.

पख्याखाली आरामात बसणारे.

सायकाळी टी. व्ही. बघत बसणारे.

नाही तर क्लबात जाणारे !

पूर्वी मुसलमानाची तुम्हाला भीती होती, आता हरिजनाची !

बहुतेक भिताभिताच जन्म जाणार !

आणि आता तर 'मुसलमान–हरिजन भाई–भाई'च्या घोषणा सुरू झाल्यात !

मग तर कुत्रे हाल खाणार नाही.

मुसलमान व हरीजन एकत्र झाले तर तुम्ही तुमच्या देशात अल्प संख्यांत जाणार.

आणि सवर्ण अल्पसंख्य तरी एकत्र आहेत का ?

ब्राह्मण वेगळे.

त्यात औदिच्च ब्राह्मण वेगळे, नागर वेगळे, भार्गव वेगळे.

वाणियांत मोडवाणिया वेगळे, जैनवाणिया वेगळे.

पटेलात चार जाती.

पुन्हा प्रादेशिक वर्गीकरण आहेच. हे सौराष्ट्रातील पटेल वेगळे, हे आणंदचे पटेल वेगळे.

त्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. संख्येच्या शर्यतीत सवर्ण नक्कीच मार खाणार !

बावीस लोक आजपर्यंत ठार मारले गेले. त्यातील एक जण पोलीस होता. त्याला तलवारीने या हरिजनानी चक्क कापून टाकला वरून खालपर्यंत! पोलीस म्हणे सवर्ण होता !

दुसऱ्या एका पोलिसास कलोळ येथे सुरा मारला, तोही मरण पावला.

आगीचे तर अनंत प्रकार आहेत. हे पेट्रोल या मंडळीना कोठून मिळते ?

जामनगरमध्ये काडला पोर्ट ट्रस्टच्या जीपाच जाळून टाकल्या. एक एस. टी. बसदेखील अशीच भस्मीभूत केली !

भुजमध्ये याच कारणासाठी सतत अश्रुधूर सोडतात. विद्यार्थी दुकानाची लूटमार करीत होते.

अमरेलीत राखीव जागांचा 'राक्षस' विद्यार्थी जाळीत होते, पोलिसानी अश्रुधूर सोडून गर्दी पांगविली, राजकोटमध्ये रोज सघंसी (मोर्चे) निघतच आहेत.

नाडियाद-बाबूभाईंचे गाव.

तेथे राखीव जागाविरोधी समितीने एक गधेडा-सर्घस (डॉंकी मार्च) काढली. त्यात पंचवीस गाढवे होती. पोलिसांनी ही गाढवाची यात्रा अश्रुधूर सोडून पागविली.

थोडक्यात, गुजराथभर दगे चालू आहेत !

लढा, बेटधानो, लढा, एकमेकाचे जीव घ्या !

यात फायदा कोणाचा आहे ?

सत्य सांगून पटणार आहे का कोणास ? उगाच महर्षी व्यासाप्रमाणे आपले अरण्यरुदन ठरायचे. व्यासजी नव्हते म्हणाले, 'दोन्ही हात उच करून मी एवढा कंठशोष करतोय, पण कोणी ऐकत नाही. कोणी ऐकत नाही !'

मग आपले कोण ऐकणार ?

बसा स्वस्थ !

¤

बडोद्यास नवीन कलेक्टर येणार. नाव आहे अशोक चावला.

पण चौधरी कलेक्टरचे काय ?

अत्यत चागला, भला माणूस. मोस्ट एफिशिअंट; या तरुण वयात कॅन्सर झाला आहे, ऑपरेशन झाले.

त्याच्या भलेपणामुळे बडोद्यात बरेच गोळीबार वाचले. नाही तर कित्येक निष्पाप मुले हकनाक ठार झाली असती !

आणि मुलांना वाचविणारा हा तरुण बिहारी चौधरी ?

परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो !

चागल्या माणसाची या दुनियेत फार खोट आहे, वाण आहे.

नवीन कलेक्टर कसा आहे कोण जाणे !

सनतभाई म्हणाले होते, 'चागला कामसू आहे हा नवीन कलेक्टर !'

भेटले पाहिजे म्हणजे कळेल.

पण चौधरी जास्त दिवस सुखाने जगू द्या !

## सव्वीस फेब्रुवारी

काय बातमी आहे ?

जे. एम. राठोड यानी अहमदाबादेच्या सर्व हरिजनांना बौद्ध होण्याचे आवाहन केले आहे.

आपल्याला हे सवर्ण नीट वागवीत नाहीत, म्हणून हा त्रागा !

पण मग सवलती मिळणार नाहीत. त्यामुळे तरी बौद्ध होणार नाहीत.

आता हा Vested interest चा नवीन वर्ग निर्माण झाला आहे. दलित राहण्यातच त्यांचा interest आहे. त्याच्या पुढाऱ्यांचा Vested interest देखील त्यातच आहे. नाही तर याना विचारणार कोण ?

हे राठोडसाहेब म्हणतात, जर डॉ. बाबासाहेब आबेडकराचे सर्व हरिजनानी ऐकले असते तर हा प्रश्न मुळी उद्‌भवलाच नसता !

¤

रात्री वेळ जात नव्हता म्हणून दिल्लीला फोन लावला आमचे एक राज्यसभेत दोस्त आहेत, त्याचे फोन नेहमी येत असतात; पण ते फोन सरकारी खर्चाने होतात. हा खर्च माझ्या पदराला चाट लावणारा आहे.

हा दोस्त म्हणतो, 'लेका, तू आज लोकसभेत पाहिजे होतास. काय इदिरा गाधीने नाटक केले ! सुपर्ब !'

'का काय झाले ?'

'अरे, सुपर्ब नाटक, इतके दिवस गरीब-गरीब म्हणत होती. मुसलमान तिच्या बाजूने आहेतच आणि आता ही दलिताची कैवारी ! गाधीजीच्या जन्मभूमीत हे काय चालले आहे ? मला मनाला हे दगे पाहून अतीव यातना व दुःख होत आहे. हा मार्ग चुकीचा आहे. हं, गुणवान लोकाचा त्यात बळी जाऊ नये, पण बिचाऱ्या गरीब, अनाथ हरिजनाना या भूमीवर त्राता आहे कोण ? राखीव जागा आम्ही चालू ठेवणार. कारण घटनेत तसे सांगितले आहे. (पण लेको, घटना तुम्हीच बदलता ना वर्षाला दोनदा !) खरंच, आज तू दिल्लीत पाहिजे होतास. सुपर्ब नाटक ! फक्त रडायचे बाकी ठेवले होते !'

'एक विनंती !'

'काय ?'

'सध्या चार-पाच दिवस रोज रात्री अकरा वाजता तुम्ही फोन करायचा, दिल्लीचे ताजे वार्तापत्र सागण्यास !'

'पण कशाला, आज गुरुवार. मी शनि-रवि बडोद्यातच आहे. खूप गप्पा मारू !'

टेलिफोन बद होतो.

मी सुस्कारा सोडतो.

दिल्लीचा फोन म्हणजे सहज पन्नास-साठ रुपये खर्च होतात.

मी अहमदाबादेस माझ्या एका डॉक्टरमित्रास फोन लावतो, 'आज की ताजा खबर क्या है ?' मी विचारतो.

'मूर्ख आहेत आपली पोरे !'

'पण एवढा गरम का होतोस ?'

'राज्य गृहमंत्री योगेंद्र मकवाण्याला एक मुलगी आहे. तिला पळवून नेण्याचा कट या पोरानी केला होता. सुदैवाने तो फसला,

नाही तर घनघोर युद्ध झाले असते. डोकी फोडली असती या पोराची. गोळीबार केला असता !'

'पण पेपरमध्ये कुठे नाही ?'

'मूर्खा, असल्या बातम्या का कुठे पेपरवाले प्रसिद्ध करतात ? ह्या, तिला पळविली असती तर कदाचित भडक मथळा देऊन ती बातमी प्रसिद्ध झाली असती !'

'पण तुला कसे माहीत ?'

'इंदिरा कॉंग्रेसची सभासद ओळखीची आहे एक. तिने सांगितले.'

'नाव काय ?'

'कु. शांता चावडा.'

'पण बातमी खात्रीची ?'

'बाप्पारे, छापू बिपू नकोस हं !'

टेलिफोन कट झाला.

¤

मी पुन्हा टेलिफोन जोडतो. मित्राला सुनावतो, 'और कुछ ?'

'काल येथे महायुद्ध होते. शहापूर विभागातील वणकर विस्तार सारा बी. सी.चा. ते लोक चागलेच पिसाळले आहेत. त्यांना शांत करण्यासाठी पोलिसांनी दोनदा गोळीबार केला म्हणतात, चार-पाच लोक ठार का घायाळ झाले आहेत. अश्रूवायूची ३५ नळकाडी फोडली म्हणजे पहा !'

'चार-पाच लोक ठार ?'

'पेपरात नाही येणार. गेले सहा दिवस साऱ्या मिलसचे काम बंद आहे. कामगार बहुसंख्य अवर्ण आहेत. त्याना उद्योग नाही. रोज त्याना चिथावणारी भाषणं द्यायला कोणी न् कोणी येते. तुमच्या मुबईहून कोणी दलित पँथरसंचे नेते येथे येतात व त्याना मार्गदर्शन करतात, असे येथे बोलले जाते. खरे-खोटं कळायला काही मार्ग नाही. पण पेपरात येते त्यापेक्षा खूप भयानक आहे परिस्थिती. सुरामारी व तलवारीचे वार या शाहपुरात कॉमन झाले आहेत. कागडापीठ पोलीस चौकीच्या आसपासच अनिश्चित मुदतीचा कर्फ्यू लावण्यात आला आहे. कापडाची दुकाने लुटतात. लाकडाच्या केबिन्सना आग लावतात. कापडव्यापाऱ्यांच्या प्रमुखाला, शेठ हिराभाईला, कापड-मार्केटमध्येच बेदम मारले. सारा कापडबाजार बंद आहे. दरियापूर व काळुपूर आपले नेहमीचे तोफानी विस्तार, तेथे नेहमीप्रमाणे धमाल चालू आहे. अहमदाबाद-गांधीनगर रस्त्यावर राधेजा गाव आहे. तेथे बस पेटवून दिली होती.'

'कोणी ?'

'बहुधा विद्यार्थ्यांनी. असारवा विभागातदेखील बस जाळली. शहरात हुल्लड चालू आहे. तीसएक लोकाना अटक केल्याची रेडिओची बातमी आहे.'

'बहु थयु !' ( खूप झाले ) असा एकदम अनोळखी आवाज येतो.

मी दचकतो व मित्रास विचारतो, 'काय म्हणालास ?'

'टेलिफोन टॅप होतो आहे, बाबा, बद कर !' मी रिसिव्हर खाली ठेवतो.

मगाशी टेलिफोन कट् का झाला ते आता माझ्या लक्षात येते.

'इंदिरा माता की जय' असे म्हणून मी झोपावयास जातो.

पण टेलिफोन बग होत आहे या विचाराने माझी छाती उगाचच धडधडत असते.

दिल्लीशी बोलताना मी जास्त सावधपणे बोलले पाहिजे, असे मी मनातल्या मनात ठरवितो.

---

## सत्तावीस फेब्रुवारी

---

गुजराथ बंद.

म्हणून बडोदे बंद

पोरे रस्त्यारस्त्यावर हिंडत आहेत, ती उगाच दगडफेक करतील म्हणून सारेजण निमूटपणे दुकाने बंद करतात.

मीही माझा दवाखाना बंद ठेवतो. उगाच गद्दारीचा आरोप नको.

सारे बडोदे सामसूम आहे

रेडिओवर बातमी आहे, मकवाना दर्दभरी आवाजात विरोधी पक्षास विनंती करीत आहे, 'हे आंदोलन बंद ठेवा, म्हणून. गुजराथ-भर हरिजनावर अत्याचार होत आहेत हे चागले नाही. हरिजन स्त्रियावर बलात्कार होत आहेत, ही तर शरमेची गोष्ट आहे. घटनेनुसार दिलेल्या सवलती काढण्याचा आपल्याला अधिकार काय ?"

'क्लिनिकल क्षेत्रातील ६० जागापैकी एकपण बी सी. ला नाही. बिनक्लिनिकल जागातही एकच प्राध्यापक बी. सी. आहे. त्या ३४ जागा आहेत. कमी नाहीत. दुय्यम प्राध्यापकांच्या ३१ जागांपैकी एकही बी. सी. नाही.'

ह्या आकडयाच्या आतषबाजीत सामान्य माणसाला काही कळत नाही. हे सारे तात्त्विक आहे त्यात त्याला रसही नाही. ही सामान्य सवर्णांची बात, मग हरिजनांची काय कथा सांगावी ?

मणीपूरच्या कॉंगी सरकारचे आज एकदाचे पतन झाले.

गुजराथच्या कॉंगी सरकारचा नबर केव्हा लागणार ?

¤

होम मिनिस्ट्रीतील माझे ओळखीचे एक डिरेक्टर आले. आपण त्याना बाबूभाई म्हणू या. खरे नाव सागितले तर त्याच्या पोटावर पाय यायचा.

आणीबाणीनंतर ही दयनीय स्थिती झाली आहे सरकारी अधिकाऱ्याची.

त्याना खूप सागावेसे वाटते. सारी माहिती देतात, मार्गदर्शन-देखील करतात, पण त्याना भीती वाटते दोन गोष्टीची

(१) बदलीची. उगाच दूर अदमानात कोठे फेकून दिले तर काय करा !

(२) आणि हा अधिकारी 'संघीय' आहे ह्या लेबलाची ! कारण, सघीय म्हणून एकदा का शिक्का लागला की सपली त्याची करिअर. तो ओझी वाहणारा गाढव ! नो प्रमोशन. डीमोशनच.

बाबूभाईंना दिल्लीत काय चालले आहे त्याची माहिती मी विचारतो.

मनमोकळेपणाने ते सागतात की, आसाम व गुजराथ या दोन्ही राज्यानी इंदिरेचे सिंहासन बळकट केले आहे. आता पंचवीस वर्षे

तिला चिंता नाही. अर्थात यावच्चंद्र दिवाकरौ नाही, पण यावद एच. एम. टी. आहेत तोपर्यंत.

'म्हणजे काय ?' मी विचारतो.

'एच म्हणजे हरिजन एम. म्हणजे मुस्लिम आणि टी म्हणजे ठाकरडा. गिरिजन.

बाईंची प्रतिमा गरीबाची कैवारी म्हणून तर आहेच

आता आसामच्यामुळे ती मुस्लिमाची सेव्हियर बनली. बिचारा शाही इमान ! त्याच्या व शेख अब्दुल्लाच्या शिडातील हवाच काढून घेतली आहे.

अंतुले इज डुइंग वंडरफुली वेल.

मुबईतील अरब, मिरजेतील अरब महाराष्ट्राच्या मुस्लिम राजवटीवर बेहद्द खूष आहेत.

साऱ्या भारतातील मुसलमानांना अंतुले म्हणजे सर्वोत्कृष्ट शो बॉय झाले आहेत. आणि आसामची मुख्य मैत्रीण आहे पाकिस्तानीच. बागला देशीय. पण त्यामुळे पाकिस्तानातील मुस्लिमाना काहीच बोलता येत नाही. तोंड दाबून बुक्क्याचा मारा. आता पाकिस्तानात लोक जास्त करून हिंदीचा वापर करतात. सिंधी, पंजाबी, बलुची, कच्छी. गुजराथी–साऱ्या मुसलमानांना एकत्र बांधण्यासाठी एकच भाषा–हिंदी, किंवा हिंदुस्थानी म्हणा हवे तर. आणि भारतात उर्दूचा प्रसार सुरू झाला आहे !'

गिरिजनाची स्थिती हरिजनांपेक्षाही कफल्लक व कफोडी. त्यांना काही समजतच नाही. इंदिरा राणी आपली, एवढेच ते समजतात

आणि हे एच. एम. टी. मिळून लौकरच मेजॉरिटी होतील आणि हिंदुस्थानात, भारतात, इंडियात सवर्ण अल्पसंख्याक होतील. कटकट गेली. त्यांना विचारायलाच नको. लोकशाही म्हणजे संख्येची दादागिरी.

आता पंचवीस वर्षे इंदिराशाही !

सतरा वर्षे नेहरुशाही चालली.

इंदिराशाही डबल म्हणजे चौतीस वर्षे चालेल !

जय एच. एम. टी.

## अठ्ठावीस फेब्रुवारी

काल गुजराथभर हिंसेचे भयंकर ताडवनृत्य होते.

अहमदाबादमध्ये गोळीबारात अधिकृतपणे दोघे ठार झाले. दोघे म्हणजे खरे बारा का वीस ? सरकार खरे आकडे कुठे प्रकट करते ? आजच सकाळी अहमदाबादेहून विसुकाका आले ते तिथला हिंसाचार वर्णन करीत होते. ते ऐकून पोटात धस्स झाले !

पत्रकारांना अधिकृतपणे कोठेही आज-काल जाऊ देत नाहीत. काल बडोद्यात जिल्हा पंचायतीची चुंटणी ( निवडणूक ) झाली. सभागृहात पत्रकारांना प्रवेश नव्हता. पत्रकारांच्या राखीव जागाही नव्हत्या आणि प्रेक्षकांच्या गॅलरीतदेखील प्रवेश नव्हता. पूर्वी पत्रकारांचा असा अपमान फक्त एकदाच घडला होता. इंदिरा गांधी विमानतळावर आल्या होत्या तेव्हा पत्रकारानाही आत येण्यास परवानगी दिली गेली नव्हती. म्हणून पत्रकारानी त्या समारंभावर बहिष्कार टाकला होता. जिल्हा विकास अधिकारी गोहील यांनी या पंचायतीच्या निवडणुकीच्या वेळी विचारले होते, 'पत्रकारोनी पंचायतनी चुंटणीमां शूं जरुर छे ?'

याचे कारण गुजराथमधील भयंकर बिघडत जाणारी परिस्थिती हेच असावे. पत्रकारानी कटु सत्य लिहिले तर ते सरकारला आवडणार नाही. पचणार तर नाहीच नाही !

बडोद्यात शांतिनिकेतन मेडिकल कॉलेज सुरू झाले आहे. सरकारने मेडिकल कॉलेज बंद केले म्हणून डॉक्टरानी समांतर कॉलेज सुरू केले आहे. मुबईच्या नॅशनल मेडिकल कॉलेजची येथे आठवण होते. काल त्या समांतर कॉलेजात सत्यनारायणाची कथा सांगण्यात आली. अहमदाबादेचे ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. दिनुभाई पटेल व इथले पॅथॉलॉजिस्ट डॉ सुरेश अमीन याची व्याख्याने झाल्यावर काल अहमदाबादेत दोन हजार डॉक्टरांची सरकारने जी धरपकड केली त्याचा निषेध करण्यात आला. त्याचप्रमाणे 'सबको सन्मति दे भगवान !' म्हणून देवाला आळवणेही झाले.

आज दहा वाजता विद्यार्थ्यांचा मोर्चा आहे. सतीश देसाई (सायन्स), निलेश मोदी ( पॉलिटेकनिक ), एम. आर. अँथनी ( सायन्स ) व तुषार त्रिवेदी ( कॉमर्स ) हे विद्यार्थी हमरस्त्यावर मशाल घेऊन धावत जाणार आहेत. संध्याकाळी साडेपाच वाजता 'अनामत (राखीव) रद करो' असे लिहिलेले मोठे मोठे फुगे शहरातील निरनिराळ्या जागांवरून हवेत सोडले जातील. त्याचे दिग्दर्शन मुकेश काशीवाला करणार आहे.

ही आपल्या मुलाची मजा झाली, मस्करी झाली, पण आजचे पेपर्स वाचून मन विषण्ण होते. चांगली मस्करीची कुस्करी चालविली आहे गुजराथ सरकारने !

अहमदाबादेत मोठमोठे जमाव सर्वत्र आग लावण्यासाठी फिरत होते म्हणून म्हणे सरकारने गोळीबार केला. किती वेळा ? तर नऊ वेळा ! त्यात दोघेजण जागच्या जागी ठार झाले ! बरोबर गेल्या महिन्यात याच तारखेस अहमदाबादेत असेच हिंसाचारी वातावरण होते व असाच गोळीबार सरकारने केला.

विसूकाका म्हणतात, सरकारच्या प्रचारावर जाऊ नका !

सरकार म्हणते, ह्या लोकांच्या टोळ्या झोपडपट्ट्यांना आग लावायला जात होत्या, म्हणून आम्ही गोळीबार केला !

खरी असेल ही बातमी ?

का पुन्हा गरिबांचे कैवारी म्हणून 'हिरो' होण्याची ही धडपड ? व्होट बँक सुरक्षित ठेवण्याची ही खटपट तर नाही ?

विसूकाका म्हणतात, या झोपडपट्ट्यांत कोणी चिटपाखरू देखील रहात नव्हते. लोक सध्या कामधंदा मिळत नसल्याकारणाने त्या झोपडपट्ट्या सोडून गेले होते. आणि हो सकता है, ये आग सरकारके पोलीस लोगोंने जानबूझकर लगाई होगी ! शक्य आहे, या देशात काहीही होऊ शकेल. जिस देशमें गंगा बहती है !

'पण का ? कशासाठी ?' माझा प्रश्न.

'जमावाला चिथावणी द्यायला, त्यावर गोळीबार करण्यासाठी !'

'पण ही तर आपलीच माणसे ना ?'

'सरकारला आपली माणसे कोण वाटतात, माहीत आहे ? जी मुकाट्याने चूप बसतात, सहन करतात व शांतपणे मरतात ती,

दुसरी कोणी नाही !'

'म्हणजे दलित.'

'त्यात सवर्ण आले, दलित आले. सरकारला पोस्ट ग्रॅज्युएट पातळीवर दलित डॉक्टरांना प्रवेश द्यायचा आहे. त्याचे कारण माहीत आहे ?'

'कोणते ?'

'विश्वनाथ गुजराथचे गव्हर्नर होते. ते बी. सी. होते. त्याच्या मुलाला एम. डी साठी प्रवेश मिळत नव्हता. म्हणून त्यानी ही युक्ती केली. पूर्वी एम. डी. व एम. एस. ला गुणवत्तेप्रमाणे प्रवेश मिळत असे.'

'काय सांगता आहात ?'

'नाही तर काय ? ह्या सरकारला काय हरिजनाचा खरा कळवळा आहे ? अजून गुजराथमध्ये सर्वत्र डोक्यावर मैला घेऊन जाण्याची घाणेरडी पद्धत आहे. करा ना ती नाबूद व त्याऐवजी सेप्टिक टँकचे संडास सुरू करा ना ! फार काय, हे मैला वाहून नेणारे भंगी ज्या भागात रहातात तेथे साधा म्युनिसिपालिटीचा मोठा नळ देखील नाही ! कशाला म्हणावे गप्पा मारताय हरिजनाना मेडिकलचे आम्ही शिक्षण देतो म्हणून, त्याना प्राथमिक शिक्षण तर द्या साधे, मग मेडिकलचे. चोर ! बदमाष !'

विसूकाका समाजशास्त्रज्ञ आहेत. ह्या बाबतीत त्याचे ज्ञान अद्ययावत आहे. सात्विक संतापाने विसूकाकाचे सारे शरीर थरथर कापत होते.

'हे हरिजन डॉक्टर झाले म्हणजे हळूच आपली नावे बदलतात व आपल्याच जातभाईंना वाईट वागवितात ! फारच वाईट वागवितात !'

'त्याला काय उपाय आहे ?'

'उपाय आहे, चागले शिक्षण द्या, योग्य शिक्षण द्या. हे असे लाडावून ठेवू नका. नाही तर हे असेच दगे दरवर्षी होणार, गोळीबार होणार. हे वाचा, हे वाचा !'

विसुकाकानी लोकसत्ता उघडली व ते वाचू लागले, 'दक्षिण गुजराथमध्ये निझर येथे आदिवासी हॉस्टेलवर हल्ला झाला. त्यात एक पोलिस कॉन्स्टेबल घायाळ झाला. त्याला धुळ्यास नेण्यात आले. तेथे तो मरण पावला.'

'मेहेसाणा जिल्ह्यात सकाळी कर्फ्यू उठल्यावर मुले दगडाचा मारा करू लागली. म्हणून पोलिसानी गोळीबार केला. हुं. लोकाना पागविण्यासाठी का कोठे गोळीबार करावा लागतो ? दादूमिया, रीड बिटवीन द लाइन्स.'

'मला कळले नाही.'

'डोबल तुमचे, सरकारचा सारा प्रचार. सरकारने सागाव आणि आम्ही ते ऐकून घ्याव. कलोल, विसनगर आणि खेराळु येथेही म्हणे पोलिसाना लोकाना पागविण्यासाठी गोळीबार करावा लागला. विसनगरात त्या लोकानी सारे व्यवहार या गोळीबाराचा निषेध करण्यासाठी बद ठेवले. कच्छ जिल्ह्यात अजार येथे त्याच कारणासाठी पोलिसानी म्हणे चार राउडस् गोळीबार केला. साऱ्या गुजराथमध्ये दारू खुली होऊन लोकाची डोकी फिरली आहेत असे का म्हणावयाचे आहे तुम्हास ?'

मी काही बोलत नाही. शात बसतो.

'जुनागढ जिल्ह्यात उना येथे पोलिसावर दगडफेक झाली. येथे बहुधा दारुबदी जारी असावी. येथे पोलिसानी गोळीबार न करता अश्रुवायू सोडला व जमावास पांगविले.'

मला एकदम हसू येते.

'अहमदाबादेतील दंग्याच्या जागा पाहा. उस्मानपुरा, कागडापीठा, शाहीबाग, कोटडा—मला ही चिन्हे नीट दिसत नाहीत.'

'का ?'

'अहो, हे तर यवनाचे अड्डे. काही कारणामुळे तुम्हाला ठोकायला मिळत असेल तर काय हरकत आहे ? याचे हात शिवशिवतच असतात.'

मी गंभीर होतो एकदम. अहमदाबादेतील हे वैशिष्ट्य मला माहीत आहे. फक्त कै. स. गो. बर्वे यानी या यावनी अड्ड्याना सरळ केले होते. ते पुण्याला कमिशनर व्हायच्या आधीची गोष्ट आहे. गोधा व अहमदाबादेतील त्याची कारकीर्द लोकांच्या अजून लक्षात आहे. 'परित्राणाय साधूना विनाशाय च दुष्कृताम् !

वाजपेयींनी अहमदाबादेत सर्वत्र हॉस्पिटलाना भेटी दिल्या व घायाळ लोकाच्या तब्येतीची विचारपूस केली.

भा. ज प. च्या वाजपेयीजीचे सर्व इंग्रजी व गुजराथी वृत्तपत्रानी मोठमोठे मथळे देऊन खूप स्वागत व प्रशसा केली आहे. मुख्य म्हणजे कोठेही पाय खेचण्याचा प्रयत्न केलेला नाही.

चला, आमच्या प्रयत्नाना यश आले तर. मी व माझ्या काही मित्रानी निरनिराळ्या विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्याना पत्रे लिहून इथली परिस्थिती कळविली व त्याना येथे भेट देण्यासाठी निमंत्रण दिले. त्या त्या पक्षाच्याही लोकांना तसे सांगितले.

भा. ज. प. ची पक्षीय यत्रणा चागली दिसते आहे. भा. ज. प. चे शिष्टमंडळ ताबडतोब आले ! काल माधवसिंग सोलकीबरोबर त्यानी दोन तास चर्चाही केली.

अजून नानासाहेब गोऱ्याचे उत्तर कसे नाही ? त्याच्या पक्षाच्या लोकांना सागितले तर म्हणतात, 'अरे, अजून तर ज्वाळा वर येऊ देत ना. मग बोलावू, म्हणजे नीट क्रेडिट मिळेल.'

या वेड्याना काय म्हणणार ?

यात क्रेडिटचा सवाल कोठे आहे ? असा प्रश्न केला तर उत्तर मिळाले, 'आमच्या नेत्याना कशाला त्रास देता ? मकवाना विरुद्ध माधवसिग सोलकी असा हा झगडा आहे. किल्ली इदिरेच्या हाती आहे. राजकारणी नेत्याना उगाच का खड्डयात टाकता ? विशेषत: क्रेडिट मिळणार नसेल तर ! आमचा पक्ष भाजपसारखा श्रीमंत थोडाच आहे ? गांधीयन सोशालिजम् म्हणजे बिर्ला, बजाज, किर्लोस्कर ज्याच्या आजूबाजूस वावरतात, त्या गाधीचा समाजवाद.'

जगजीवनरामाना पत्र गेले व तेही आठवड्याने येणार आहेत, असे त्याच्या एका खास भक्ताने येऊन सांगितले.

दलिताची त्याच्या पुढाऱ्याबद्दलची भक्ती मला आवडते. समाजवाद्यात ती श्रद्धा आली तर ते किती पुढे येतील !

अडवाणीची वॉनिंग आपल्याला आवडली. गुजराथ सरकारला हे आदोलन आवरता येत नाही. त्यामुळे हे आदोलन आता वर्गयुद्धाकडे चालले आहे आणि तरीदेखील सरकार गप्प गप्प !

माधवसिंग सोलकी व वाजपेयीजी याची चागली जुंपली. आर. एस एस. व भाजपचे लोक यास जबाबदार आहेत असे म्हणताच वाजपेयीजी गरजले, 'पुरावे द्या !–'

माधवसिंग सोलकी चूप बसले. ( अपूर्ण )

# मनातल्या कविता

## पौगंडावस्थेतील भावाविष्कार

मराठी साहित्यात गेल्या काही वर्षांत कविता हा प्रकार फार फोफावला आहे. ' फोफावला ' म्हणण्यामागे सख्यात्मकतेचा सदर्भ आहे. गल्या काही वर्षांत निघालेल्या काव्यसंग्रहाची सूची करणे हे एक अवघडच काम होऊन बसले आहे. या काळात वाढलेल्या कवींची सख्या भरमसाठ आहे, पण या सर्वांत गुणात्मकतेच्या दृष्टिकोनातून कवितेत फार मोलाची भर पडली असे म्हणणे घाडसाचे ठरेल. वाढत्या संख्येच्या मानाने दर्जेदार कवींची व कवितांची सख्या हाताच्या बोटावर मोजता येण्याएवढीच भरेल.

या काव्यसग्रहामध्ये प्रा. माधव थोरात यांचा ' मनातल्या कविता ' हा संग्रह लक्ष वेधून घेतो. ह्यातील काही कविता तर स्मरणीयही वाटतात. प्रा. थोरात याचा हा दुसरा काव्यसग्रह.

प्रा. थोरातांच्या कवितांचा विषय प्रामुख्याने ' ती ' आहे. आयुष्यातल्या मोहोरून गेलेल्या काळातील हे अनुभव कवी शब्दबद्ध करतो. सग्रहाच शीर्षकच 'मनातल्या कविता' अस आहे. या कविताही कधी काळी अलगद उतरलेल्या आहेत. त्या मनातल्या आहेत हे खरच, पण हा अनुभव सार्वकालिक असल्याने या कविता ' जनातल्या 'हो आहेत.

या कवितांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्या अनुभवाची पुनरुक्ती करीत नाहीत. अतिशय नेमक्या शब्दात त्या आशय माडतात. आशयातील तीव्रता, शब्दाच्या अर्थाच्याद्वारे ही कविता समर्थपणे माडताना काही ठिकाणी दिसते.

सग्रहात एकूण शभर कविता आहेत. त्यात पहिली कवीची प्रस्तावनेद्वारा कविता मिळवायला हरकत नाही.

' एक तपाहून अधिक काळ
शब्दांनी जपल्या ' मनातल्या कविता '
अनेकांचे लाभले प्रेम
धीट झाल्या बघता बघता
महाराष्ट्र सरकारच्या अनुदानामुळे
मनातल्या कविता मनाबाहेर '

अशी या संग्रहाची सुरुवात पाहिल्यावर प्रथम कससंच वाटलं. कवीना प्रत्येक गोष्ट काव्यात्म पद्धतीने माडायची हौस का असते हे कोडं यामुळं पडतं साधी सरळ वाक्ये न लिहिता कवितासंग्रहाची प्रस्तावना म्हणून कवी कविताच लिहितो. ही खटकणारी गोष्ट आहे.

कवीचं सामाजिक ज्ञान काही थोड्या कवितातून व्यक्त होतं, त्यापेक्षा प्रेमाचा तरल सवेदनाक्षम अनुभव ही कविता अधिक समर्थपणे व्यक्त करते

' शब्द हवेत मला
मानावर असलेले
मनावर होऊन
रणांगणात घुसलेले
– – – –
शब्द हवेत मला
झोपडपट्टीत फिरलेले
माणुसकी पारखण्यात
पुरे पुरे मुरलेले

अशा कवितेत तकलादूपणा प्रकट होताना दिसतो. अशा कविता शब्दबंबाळही होतात. कारण त्यामध्ये नेमका अर्थ असत नाही, अनुभव असत नाही, तो केवळ शब्दाचा खेळ असतो.

' बागेतल्या एका कलिकेला पाहून '... ही ३४ वी कविता तर चक्क जुळवलेली आहे. यात अनुभव, आशय यांचा थागपत्ताच लागत नाही. ' वर वर दिसायला शब्द, नुसते ' वा ! छान !! ' पण आत असते राजकारण म्हणून धरावा लागतो कान ' अशासारखी रचना असे कवी करू कसे धजावतात याचेच आश्चर्य वाटते. कारण सग्रहातल्या इतर काही सुदर कवितांच्या पार्श्वभूमीवर अशा कविता चटकन ' डोळ्यात भरतात.'

हे सगळ असलं तरी थोरातांची कविता मुख्यत्वे प्रेमकविता आहे असच मला वाटतं.

काही हरवल्याचा शोधण्याचा बहाणा
तू तर स्वतःलाच हरवून बसलीस.
तू सोयिस्करपणे कशी काय विसरतेस
मीही कधी तरुण होतो '

असे प्रश्न विचारणारा हा कवी कविताची मूळ प्रेरणा काव्यात्मक पद्धतीने व्यक्त करताना म्हणतो, ' फुलपाखराचे रंग लेवून भेटलीस तू त्या अल्लडवयात.

रंग ओला आहे हे कळलेच नाही मला
पण तेवढ्या न कळण्याचाच पुढे हा ग्रंथ जाहला.

या प्रेमकवितांचं भावविश्व अतिशय तरल आहे, संवेदनाक्षम आहे ही कविता प्रतिमा, प्रतीक, रूपकथा या आडवळणानं जाणारी नाही तर ती सरळ, विधानात्मक आहे. ' स्वत ला विसरता आलं म्हणजे कसं छान जगता येतं ' असं म्हणणारा हा कवी

' किती हळुवारपणे
नखे कुरतडतेस तू
आमची नखाएवढी तरी
काळजी करायची होतीस '

किंवा

' भावनाचे माझ्या पोतोरे करून
पुसून टाकलेस तू सारे आलेख
वर म्हणतेस अंतरंग नाही कळले
काय पण तुझे खेळ एकेक '

अशा गतकाळातल्या आठवणीवर जगतो या आठवणी विसराव्यात असं त्याला वाटत नाही. उलट त्याची सय त्याला सतत तजेलदार करीत असते.

या काव्यसंग्रहातील काही कविता लावणीच्या ढगाच्या आहेत. नुसतो भावस्पंदने, वगैरेपेक्षा मुक्त शृंगारही हा कवी समर्थपणे माडतो.

' धपापत्या उरोजाचा दाह झाला अनावर
म्हणूनीच पदर हा फिरतसे वाऱ्यावर '

किंवा

' किती गडबड बाई
जरा हळूहळू चाल
तिथे पदराचे आणि
इथे आमचे ग हाल '

यासारख्या वेगळ्या ढंगाच्या कविता सग्रहात लक्षवेधी ठरतात. पण या कवितामध्ये थोरातांनी त्याच त्या प्रतिमांचा वापर केल्याचे दिसते. अनुभव जुनाच, शब्दही जुनेच, फक्त मांडणी वेगळी असे त्याचे स्वरूप दिसते.

या कवितांबरोबरच थोरात सामाजिक संदर्भही विसरत नाहीत.

' आम्हीही आलो असतो,
तुमच्या आसपासच्या
महापुरुषाच्या यादीत
थोडा खिसा सैल सोडला असता तर ' ...

असा उपहास ही कविता करतेच; पण

' म्हातारपण– मरणापूर्वीचे मरण ' अशी एकच ओळीची कविताही फार बोलकी ठरते.

अशा या कविता, काही लक्षात रहाणाऱ्या या कविताची निवड जरा अधिक काळजीपूर्वक करायला पाहिजे होती. काही कविता तर अगदीच महाविद्यालयीन पातळीच्या वाटल्या. शब्दबंबाळपणा हा अशा कविताचा गुणधर्म असतो; पण यातील काही कविता शब्दापलीकडे घेऊन जातात. असा तरल अनुभव शब्दात व्यक्त करताना अल्पाक्षरित्वाकडे कवी विशेषकरून लक्ष देतो हे विशेष.

ही कविता ' मनातली ' आहे, म्हणूनच आत्ममग्न आहे आत्ममग्नतेत बुडताना हा कवी स्वप्नरजन तर करीत नाही ना ? दैनंदिन जीवनात विविध पातळयावर येणारे विलक्षण अनुभव, त्यातील गुतागुत या कवितेत दिसत नाही म्हणून हे स्वप्नरंजन वाटते. अल्लड वयातील ही सर्वांचीच प्रातिनिधिक भावना प्रा. थोरातानी व्यक्त केली, एवढेच मग त्याचे स्वरूप राहते. या संदर्भात श्री. वसंत बापटाची ' मानसी ' ही कविता पाहण्यासारखी आहे. ही कविता जेवढी अल्लड, हसरी, खेळकर आहे तेवढीच ती प्रौढही आहे. तिच्या अनुभवाचा पोत वेगळा आहे, ती प्रेमाच्या विफलतेच्या अनुभवातून उद्विग्न होत नाही तर तेवढीच अल्लड बनते.

या पार्श्वभूमीवर प्रा. माधव थोरात याचा हा प्रयत्न तपासणे आवश्यक वाटते. थोराताजवळ शब्दकळी आहे, पण ही कविता अजून पौगंडावस्थेत आहे असेच वाटते.

—मुकुंद संगोराम

**मनातल्या कविता :**
प्रा. माधव थोरात,
मल्लिकार्जुन प्रकाशन, कोपरगाव,
पृष्ठे : ४८, मूल्य : ५ रुपये

## फिनिक्स निवड

# नाबाकॉव्ह

अलीकडच्या इंग्रजी लेखकात नाबाकॉव्ह हे सर्वांत उत्तम इंग्रजी लिहिणारे समजले जातात. नाबाकॉव्ह दिवगत होऊन सुमारे तीन वर्षे झाली ; परंतु त्यांच्याविषयी पाश्चात्य देशात अजून लेखावर लेख येत असतात. कधी त्याच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या आठवणी, कधी त्यांच्याविषयी समीक्षा, असे या ना त्या कारणामुळे त्याचे नाव साहित्यक्षेत्रात सारखे छापले जात आहे.

नाबाकॉव्ह हे प्रकाशझोतात आले ते त्याच्या ' लोलिता ' या पुस्तकामुळे (खोटया कारणामुळे–for the wrong reasons. ) कारण लोलिताचा एक अश्लील कादंबरी म्हणून गवगवा झाला हे सर्वांना माहीत आहेच. न समजणाऱ्या बाजारबुणग्यानी ती ' चना जोर गरम...' सारखी ' खाल्ली ! ' त्यामुळे नाबाकॉव्ह हे नाव जपानपासून यू. एस. ए. पर्यंत गाजले; पण नाबाकॉव्ह हे कोणत्याच अश्लील पुस्तकाचे जनक नव्हते. ते एक अप्रतिम इग्रजी लिहिणारे शैलीकार होते. आपण जेव्हा छापील शब्द वाचतो, वाक्यावरून नजर फिरवतो, तेव्हा कळत नकळत आपल्याला अशी जाण होत असते की शब्दाच्या रचनेमुळे वाक्याला काटूर्स येतात. काही शैलीकाराची वाक्ये सुरुवातीला झुकतात काहीची मध्येच झुकतात किंवा वर होतात, तर काहीची शेवटी कलतात. शब्दाच्या व वाक्प्रचाराच्या विशिष्ट उपयोगामुळे त्याचे वजन कमी-अधिक होत असते. खरं म्हणजे शैली, शैली आपण ज्याला म्हणतो ती दुसरी तिसरी काही नसून एक विचारांची प्रणाली असते (thanks be to ना मी ) मला ज्या गोष्टीबद्दल स्ट्राँग फीलिंग्ज असतात, ज्या गोष्टीबद्दल पूर्वग्रहदूषित विचार असतात, जे माझे आवडी-निवडीचे विषय असतात, त्या अनुषंगाने मी आत्माभिव्यक्ती करीत असतो. लेखकाच्या विचाराच्या व भावनाच्या स्पंदनामुळे वाक्ये खालीवर झुकत असतात.

तेव्हा बरेच समीक्षक जेव्हा नाबाकॉव्ह उत्तमात उत्तम शैलीकार आहे, असे म्हणतात तेव्हा त्याच्यातला खिलाडी (chess player) नेचरालिस्ट, (butterfly-lover), लेखक, प्रा, विजनवासी ( exile ), कवी, अनुवादक हा त्याच्या लिखाणातून सारखा डोकावत असतो

नाबाकॉव्ह वाक्प्रचार व शब्द कसे वापरीत याचे एक उदाहरण फ्रॉइडच्या संदर्भात देतो. सिग्मंड फ्रॉइडच्या क्षेत्राला, साऱ्या कार्याला ते internal totalitarianism म्हणतात. मला हा वाक्प्रचार अती आवडला व माझ्याकडील एका असिस्टंटला दाखवला. ती पटकन म्हणाली, ' हे लोक इतके बवॅस्टिक टेक्निकल जार्गन का वापरतात ते कळत नाही ! ' मी हिरमुसलो व आपल्याला एखादा अनुरूप असिस्टट कधी मिळेल याची वेटिंग फॉर गोदोसारखी वाट बघायला लागलो. ज्यानी एखादा मद्यपी माणूस व जुगारी अभ्यासला आहे, थोडक्यात म्हणजे ज्यानी मानसशास्त्राची रूपरेषा अभ्यासली आहे, ते लोक नाबाकॉव्हाचे internal totalitarianism ' हा वाक्प्रचार कधीही विसरू शकणार नाहीत याची मला खात्री वाटते अनेक प्रकारचे obsessions, phobias हे सुद्धा यात मोडतात.

नाबाकॉव्हनी स्वत.बद्दल आणखी एक छान वाक्प्रचार वापरला होता. तो असा, " I have never seen a more lucid, more lonely, better balanced mad mind than mine. " झाल. हे मी कुणालाच दाखवलं नाही. हे वाचून खुद्द माझ्या गोदोच्या सावलीनेच गाशा गुडाळला !

असे म्हणतात की कुणाचेही अनुकरण करणे ही त्या व्यक्तीला मिळालेली यशाची पावती. लोलिता या पुस्तकात nymphet sex हा विषय नाबाकॉव्हनी हाताळला व त्यानंतर या विषयावर अनेक पुस्तके लिहिली गेली.

पण नाबाकॉव्हला जे सागायचं नव्हतं तेच वाचकानी वाचले व इतर लेखकाना जे nymphet sex विषयी सागायचे होते त्याविषयी वाचकाचा गैरसमज झाला ! लेखक हा नेहमी दोन भाषात लिहीत असतो. एक भाषा म्हणजे अर्थात तो अक्षरे काढतो ती; पण ज्याला 'रीडिंग बिटवीन द लाइन्स' म्हणतात ती उपभाषा पण तो कळत–नकळत लिहीत जातो. जेवढा लेखक प्रामाणिक, तेवढी ही त्याची अदृश्य भाषाच आपल्याला प्रभावित करीत असते; परंतु या अदृश्य भाषेच्याबाबतीत सारखी गमत होत असते. कधी कधी ती एका वाचकाला एका रीतीने

अभिप्रेत होते, तर दुसऱ्या वाचकाला दुसऱ्या रीतीने बोध करते. हे असे झाले की मग वाचक व लेखक सारेच दात-ओठ खात असतात. शक्य तेवढे प्रामाणिकपणे लिहिले तर या अदृश्य भावेतून निर्माण झालेले गैर-समज कमी होतात.

जवाहरलाल नेहरूनी लोलिता वाचून असा निर्वाळा दिला होता की, ती अश्लील नाही. पुढे ते असेही म्हणाले होते की नाबाकॉव्हच्या लिखाणात एक प्रकारची कला आहे.

अमेरिकेतील काही कॉलेजातील संपूर्ण रशियन विभाग नाबाकॉव्हकडे होते. कित्येक भाषांवर प्रभुत्व, जागतिक कीर्ती, अनेक प्रकारचे उत्तम साहित्य हे सारे नाबाकॉव्ह-कडे होते. तरीही (ग्रॅहेम ग्रीनसारखे) त्याना नोबेल-पुरस्कार एकसारखा झुकांडी देऊ लागला. त्याना त्याची खंत होती असे नव्हे. फार प्रसिद्ध पावलेल्या लेखकांना स्वीडिश अॅकॅडेमी नोबेल पारितोषिक देत नाही.

एकदा रशियन साहित्याविषयी बोलताना ते म्हणाले होते की, ' टर्जेनेव्हची वाक्ये कशी असतात ? सरडयाच्या शेपटीसारखी. लांब व शेवटी खाली येत हळूहळू चिंचोळी होत जातात.' मी नुकतीच टर्जेनेव्हची काही पुस्तके चाळली. ती वाचली असता टर्जे-नेव्हच्या भाषेत काही खास वेगळे आढळून आले खरे.

एकदा या रशियनच्या प्रा नी रशियाच्या साहित्यिकाना ग्रेडस बहाल केल्या होत्या. प्रा. नाबाकॉव्ह या ग्रेडस आपल्या विद्यार्थ्यांना त्याच्या वहीत लिहून ठेवायला सांगत. टॉल्स्टॉय A+; पुश्किन व चेकॉव्ह A; टर्जेनेव्ह A–; गॉगॉल B–; आणि डॉस्टॉ-व्हस्की (अरेरे!) C–. काही विद्यार्थी त्या वेळी असे म्हणाले होते की, डॉस्टॉव्हस्की D+ होता. आपल्या वर्गात नाबाकॉव्ह असेही म्हणत असत की, चेकॉव्हपेक्षा ज्याला डॉस्टॉव्हस्की अधिक आवडतो त्याला रशियन साहित्य कधीही समजा-यचे नाही.

झालं. ज्या लेखकानं internal totalitarinism सर्वांत अधिक समजला त्यालाच नाबाकॉव्हनी D+ किंवा C– दिला. माझ्या मनातल्या मनात मात्र मी डॉस्टॉ-व्हस्कीला A+ दिला होता तो अजून कायम आहे. खरंच मला रशियन साहित्य उमगलं नाही !

—जे. एन. पोंडा

**' स्वर आले दुरुनी '**

# नोस्टॅल्जिआ.... नोस्टॅल्जिआ

'आठवण' या विषयावर बऱ्याच जणानी बरंच काही लिहिलेलं आहे आणि अजूनही बरंच काही लिहिता येऊ शकेल. 'आठवणीची पानं चाळायला डोळयातील पाणी लागते,' 'स्मृतीची चाळता पाने...' वगैरे वगैरे. (बाकी मलाही आठवत नसल्याने लिहीत नाही.) पण तात्पर्य असं की, माणसाला आठवणीला, भूतकाळात रमायला आवडतं. का, कशासाठी याचा ऊहापोह मानसशास्त्रज्ञानी करावा. आवडतं हे खर 'आमच्या वेळी हे असं होत,' हे पालुपद पिढ्यान्‌पिढ्या आवडीनं चालत आलेले आहे जुने चित्रपट, नाटकं अजूनही 'फुल्ल' गर्दी खेचतात त्याच हेच कारण. जुनी गाणी आजही लोकाच्या ओठावर आहेत याचंही हेच मुख्य कारण. ती मधुर आहेत, हा भाग नंतरचा. असो तर सागायचं असं की लोकाना आठवणीत रमणं आवडत !

'स्वर आले दुरुनी' या कार्यक्रमाच्याही यशाचं (शुभारंभाच्या खेळाचं यश.) नेमकं रहस्य त्यातच आहे. या कार्यक्रमात सादर होणारे सगळे शब्द आणि स्वर लोकाच्या चागल्याच परिचयाचे आहेत, जवळचे आहेत. काही काही गाणी चागली दहा-वीस वर्षांची जुनी आहेत. सगळी मडळी ती गाणी रेडिओवर व इतरत्र नेमाने ऐकतात, तरी पण या जुन्या गीताचे 'प्रत्यक्ष सादरीकरण' लोकाना खूप आवडतं. त्याच जिवावर सर्व 'ऑर्केस्ट्रे' जोरात चालू आहेत. असो.

तर 'स्वर आले दुरुनी' हा एक विविध गीताचा बराच मोठा कार्यक्रम आहे. भजने, अभंग, भावगीतं (ती तर हवीतच) सिनेगीतं, चवीला थोडं नाटयसगीत अशी सर्व प्रकाराची गाणी यात गायली गेली. यातील जवळजवळ सर्व गाण्यांचं संगीतदिग्दर्शन श्री. यशवत देव याचं आहे एकनाथ, नामदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार वगैरे संत आणि वसत बापट, मगेश पाडगावकर, वा. रा. कान्त, ग्रेस, शाता शेळके, शरच्चंद्र मुक्तिबोध, सुरेश भट, इंदिरा सत आणि खुद्द यशवत देव याच्या रचना या कार्यक्रमात सादर करण्यात आल्या.

'केळीचे सुकले बाग,' 'जीवनात ही घडी' 'तुझे गीत गाण्यासाठी' वगैरे गाणी टाळ्या आणि 'वाहवा' ची दाद घेऊन गेली आणि ते त्याच्या पूर्वपुण्याईच्याच बळावर 'समोर कोण गात आहे याचं जणू श्रोत्याना घेण-देणं नव्हतंच. गाणं कोणतं ते महत्त्वाचं !

शोभा जोशी गिरीश जोशी, शैला दातार, अरुण आपटे, अनुराधा मराठे, सुधीर दातार वगैरे पुणेकरांची परिचित गायकमडळीच या कार्यक्रमात गीतं सादर करीत होती ही सर्व गायकमडळी तशी छान आहेत पण सर्व पुरुष-गायकावर श्री. सुधीर फडके याची प्रचंड छाप जाणवते, ते जरा खटकतं.

स्वत. श्री यशवंत देवानी बरीच गाणी सादर केली. त्यापैकी त्यानी लिहिलेलं व श्री. प्रभाकर जोग यानी स्वरबद्ध केलेलं 'स्वर आले दुरुनी' हे 'टायटल साँग,' 'संथ वाहते कृष्णामाई' या गाण्याचं विडंबनगीत व एक विनोदी कविता ही दोन्ही हशे घेऊन गेली; परंतु त्यांची विशेष गरज नव्हती ते बोलतातही खूप (बाबूजीची स्टाइल ?) ते पण खटकतं, असो.

या शुभारंभाच्या कार्यक्रमास कवी मगेश पाडगावकर हजर होते. अतिशय चटकदार भाषेत त्यानी 'खुमासदार' पणे (म्हणजे नक्की कसे ?) भाषण केलं. या कार्यक्रमाचे सयोजक कॉमर्सचे एक प्राध्यापक श्री. प्रकाश भोंडे याच्या 'अव्यापारेषु व्यापारा' चे त्यानी कौतुक केले; पण सगळ्यात आनंददायी भाग म्हणजे त्यानी म्हटलेली 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' ही कविता.पाडगावकरांची कविता म्हणण्याची शैली अगदी वेगळी आहे. शब्दांमधला भाव श्रोत्यापर्यंत व्यवस्थित रीतीने ते पोचवतात. त्यामुळे पाडगावकराची उपस्थिती अत्यंत आनंददायी ठरली.

प्रमुख पाहुण्याच्या सत्कारानंतर कार्यक्रम जरा 'जास्तच' रंगला. श्रोत्यामधून 'आता आवरा !' अशी आरोळी येणं इष्ट नाही या कार्यक्रमात काही काटछाट करून, अधिक बंदिस्तपणे सादर केला जावा. तो नक्कीच हिट होईल ! बाकी हा कार्यक्रम म्हणून छान आहे, तरी लोक पाच-पाच तास शब्द-प्रधान सगीत ऐकू शकत नाहीत हेही इथे जाणवलं

एक चांगला कार्यक्रम सादर केल्याबद्दल 'स्वरगंध' संस्थेचे आभार सर्व श्रोत्यानी मानायला हवेत. हा 'स्वरगंध' खूप दूरवर दरवळो अशी या निमित्ताने शुभेच्छा !

— निखिल गजेंद्रगडकर

# मी जे वांछीन ते तो लिहो

( पृष्ठ ४ वरून )

मंत्री : ही बेमुर्वत भाषा ? तूही वर्तमानपत्रवाल्याच्या प्रवृत्तीचा आहेस तर. विरोधी पक्षाचा हस्तक असला पाहिजेस तू ! सरकारी कारभारात अशी बेमुर्वतखोरी मी खपवून घेणार नाही ! ( समोरच्या एकाला ) अशाची गय करता कामा नये वसंतराव ! याला तातडीनं सफाई खात्यात बदलून टाका !

वसंतराव : जी साहेब ! आताच तसा लेखी आदेश...

मंत्री · लेखी आदेश ? वसतराव, कामं कशी तातडीनं व्हायला हवीत. तांत्रिक बाबीत गुतून पडता कामा नये आपण !

वसंतराव : बरोबर आहे, साहेब. अशा कारभाराचा आदर्शच आपण घालून दिलाय.

मंत्री : फोनवरच तसा आदेश द्या. पुण्याच्या पोलीस आयुक्ताला आम्ही फोनवर बदलून टाकलं, हे माहीताय ना तुम्हाला ? तसं करा ! काम होणं महत्त्वाचं, मार्गाचा विचार नंतर करू. प. पू. संजय गांधीपासून आणि इंदिराजीपासून आम्ही काही शिकलो असू तर हेच !

दुसरा : खरं आहे ! खरं आहे !

वसंतराव : (शिपायाला) जा रे, उभा का अजून ? फोनवरून तुला बदलीचा आदेश देतो.

शिपाई : पण साहेब, माझं...

वसंतराव : काही बोलू नकोस. नीघ इथून !

शिपाई : ही म्हणजे हुमकूशाहीच झाली!

मंत्री : लोकशाहीच्या नावाखाली अराजक माजू देण्यापेक्षा तीच बरी. असल्या प्रकाराना आळा घालण्यासाठीच आम्ही अध्यक्षीय पद्धतीचा आग्रह धरतो आहोत.

शिपाई : वर्तमानपत्रवाल्यानी चागला समाचार घेतलाय त्याचा.

मंत्री : हेच ते. या पत्रकाराना चागलं काही दिसतच नाही.

दुसरा : बरोबर आहे ! अगदी बरोबर !

शिपाई : माझं गाऱ्हाण मी त्याच्यापुढेच माडणार आहे.

मंत्री : माड, माड. त्याना हवीच असतात असली प्रकरणं. त्याला भरपूर प्रसिद्धी देतील ते !

दुसरा : बरोबर आहे. योग्य बोललात आपण.

वसंतराव : तुला काय करायचं ते कर. इथून नीघ आधी !

(तो ताडकन् निघून जातो.)

मंत्री : वसंतराव, हे तुमच्याबरोबर आलेले कोण आहेत ? आमचे सर्व विचार त्याना पूर्ण पटतायत असं दिसतं.

वसंतराव : हे बॅरिस्टर भाऊ भोगले...

मंत्री : मघापासून पाहतोय मी, मी म्हणेन त्याला मान डोलावून होकार देतायत ते !

वसंतराव : त्याचा स्वभावच तसा आहे.

मंत्री : ठीक आहे. त्याना न्यायाधीश करू आपण. सामाजिक जाणीव दिसतेय त्यांना.

[ ते उठतात. मंत्र्याना वाकून नमस्कार करतात. मंत्री टेबलाचा ड्रॉवर उघडून एक तलवार त्याच्यापुढे करतात. ]

बॅ. : (भेदरल्यासारखे) तलवार ? मला कशाला तलवार ?

मंत्री : (डोळयांत पाणी, स्वर दाटून आलेला) महाराजाची आठवण म्हणून ! भवानी तलवार इंग्लंडमध्ये अडकलीय. ती येईपर्यंत मला चैन पडणार नाही ! शिवाजीमहाराजाची ती पवित्र तलवार परत येईपर्यंत तिची आठवण सतत जागती रहावी म्हणून...(डोळे पुसतात.)

वसंतराव : हल्ली साहेब प्रत्येकाला अशी तलवार देत असतात. केवढं हे प्रेम ! केवढी इतिहासनिष्ठा !

बॅ. : (तलवार घेत) धन्य ! धन्य !

वसंतराव : तरीही आमचे पत्रकार त्याच्यावर टीकेची झोड उठवत असतात.

तिसरा : (प्रथमच तोड उघडून) त्याना काय, उचलली लेखणी लावली कागदाला ! (स्वत च हसतो.) सामाजिक जबाबदारीची त्याना जाणीवच नाही !

मंत्री : ते लोकशाहीचे शत्रू आहेत. ( चवताळून ) पिसाळलेले कुत्रे आहेत. याचा बंदोबस्त केल्याशिवाय मी राहणार नाही !

तिसरा : एकदम कडक पाऊल उचलण्यापेक्षा वेगळयाच पद्धतीन आपण या वर्तमानपत्रवाल्याना उत्तर द्यायला हवं.

बॅ. : खरं आहे. अगदी खरं !

तिसरा : माझ्या मनात एक कल्पना आहे...

मंत्री : सागा. नव्या कल्पनाचं मी नेहमीच स्वागत करत असतो, हे तुम्ही जाणता, देशमुख.

देशमुख : आपल्या प्रसिद्धीच्या दृष्टीनं काही स्वतंत्र व्यवस्था आपणच करू शकणार नाही का ?

मंत्री : ( खूष होऊन त्यानाही एक तलवार देत ) व्वा ! देशमुख, व्वा ! तुमच्या मनात अगदी वसत फुलला बघा ! बरेच दिवस माझ्या मनात असलेली कल्पनाच बोलून दाखवलीत तुम्ही. सरकारनं स्वतःच वर्तमानपत्रं काढाव अशी माझी इच्छा आहे.

सर्व : (कौतुकाश्चर्यानं) साहेब, काय कल्पनाय् !

मंत्री : आजच्या वर्तमानपत्राबद्दलच्या नैराश्यातून या कल्पनेचा जन्म झालाय माझ्या मनात !

देशमुख . फारच वाईट असतात आजची वर्तमानपत्रं.

वसंतराव : साधं एकच उदाहरण घ्या ना, साहेबाना त्याचं नाव ' प. र. ' असं आवडत नाही, ' पी. आर. ' असं छापा, असं त्यानी किती वेळ सागितल; पण एकानंही तस केलं नाही ! उलट आता तर आवर्जून मुद्दाम ' प. र. ' छापतात !

बॅ. : वाईट प्रवृत्ती ! समाजविघातक प्रवृत्ती आहे ही !

मंत्री : माझ नाव हा फार महत्त्वाचा प्रश्न नाही बॅरिस्टर; पण त्यातून त्याची प्रवृत्ती दिसते, आपल्या सरकारबद्दलचा आणि माझ्याबद्दलचा दृष्टिकोन दिसतो. या वर्तमानपत्राचा विरोधासाठी विरोध असतो. पत्रकाराना चागलं काही दिसतच नाही ! मला नि माझ्या सरकारला, देशाच्या लाडक्या नेत्याना बदनाम करण्याचा त्याचा डाव आहे ! सरकार चागलं कार्य करतं ते याच्या नजरेला येत नाही. ते समाजापुढं यायला हवं. त्यासाठी आपल वर्तमानपत्र फार आवश्यक आहे !

बॅ. . आपल्या ध्येय-धोरणाशी नि कार्यक्रमाशी बांधिलकी मानणाऱ्यानाच त्यात संधी द्यायला हवी, साहेब! नाही तर हे आर. एस. एस. वाले आणि विरोधी पत्रकार घुस-

तील त्यात !

मंत्री : हेच झालंय. सगळीकडे घुसलेयत ते !

वसंतराव : त्याचं प्रतिबिंब दिसतच वर्तमानपत्रामध्ये.

देशमुख : अहो, पेपर उघडावा तर खून–मारामाऱ्या-बलात्कार-दंगल–लुटालूट–गोळीबार–भ्रष्टाचार असल्या बातम्याशिवाय काही दिसतच नाही ! जीवनाला आणि सरकारलाही काही चांगली बाजू आहे की नाही ?

मंत्री : हाच . हाच प्रश्न आहे. आता हे बलात्कार–अत्याचाराचच उदाहरण घ्या. राज्यात सगळी अदाधुंदी आहे, कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीला आलीय, असं चित्र रंगवायचा हा प्रयत्न आहे. एक व्यापक कटच आहे यामागे !

वसंतराव : घृणास्पद, अगदी घृणास्पद !

मंत्री : साधी गोष्ट आहे; एखादा खून होतो. घरगुती भाडणातून होतो. त्याचा समाजाशी काय संबध? एखादा मेव्हणीवर बलात्कार करतो; त्याला काही सामाजिक महत्त्व असतं का ? वास्तविक हे सगळे घरगुती प्रश्न आहेत. ज्याच्या त्याच्या घरातली ही अंतर्गत बाब आहे; पण पत्रकार त्याचा बाऊ करून ते भडकपणानं मांडतात आणि समाजात घबराट निर्माण करायचा प्रयत्न करतात. या अनिष्ट प्रवृत्तीला...

देशमुख : वेळीच रोखलं पाहिजे !

बॅं : किंबहुना अशा घरगुती बाबीचं भांडवल करणाऱ्याना कठोर शासन केलं पाहिजे!

मंत्री : तो नंतरचा भाग; पण आधीचं पाऊल म्हणून खरं, वास्तव चित्र समाजापुढं मांडणं हे पहिलं कर्तव्य आहे सरकारचं. ते पार पाडण्यासाठीच वर्तमानपत्र काढायचय्.

वसंतराव : त्याचं साधारण स्वरूप कसं असेल ?

मंत्री : त्यासाठी एक स्वतंत्र समिती नेमीनच मी; पण माझ्या मनात त्याचं स्वरूप आहे ते असं...

बॅं : कसं ?

मंत्री : त्यात बातम्या असतील, मतप्रदर्शन असणार नाही. फक्त बातम्या !

(एक पत्रकार प्रवेश करतो.)

पत्रकार : तुमच्या कल्पनेबद्दल ऐकलं. त्याबद्दलच मुलाखत घ्यायला आलोय्,

मंत्री : स्वतंत्र मुलाखत नको, चर्चाच ऐका नि लिहा काय ते !

पत्रकार : बरं !

मंत्री : तर मी सांगत होतो की, त्यात फक्त बातम्या असतील. अग्रलेख वगैरे भानगड नाही. मतप्रदर्शन नाही. टीका-टिप्पणी नाही. सरकारनं चालविलेलं चांगलं कार्य आणि विरोधी पक्षीयाचं आणि तशा प्रवृत्तीच्या वर्तमानपत्राचं अपयश यावर त्यात प्रकाश टाकला जाईल.

पत्रकार : म्हणजे मतं आधीच ठरलीयत तर? त्यांचंच फक्त प्रदर्शन करायचंय्, एवढंच. वेगळं मतप्रदर्शन नाही, एवढाच त्याचा अर्थ.

मंत्री : असं तुम्हीं म्हणू शकता.

बॅं : कारण तुम्हाला स्वातंत्र्य फार दिलंय् ना !

पत्रकार : म्हणजे रेडिओ, टी. व्ही. सारखंच वर्तमानपत्र म्हणा. !

मंत्री : हेच, हेच ते ! मी म्हणतो ती हीच प्रवृत्ती, ही मोडून काढली पाहिजे !

पत्रकार : पण 'केसरी,' 'लोकमत' मुबईत येणार असताना वेगळं वर्तमानपत्र कशाला ?

मंत्री : आणखी एक चांगली भर पडली तर काय बिघडतं ?

देशमुख : (पत्रकाराला) तुम्ही निघालात तर बरं होईल !

पत्रकार : जातो मी; पण हे असं घालवणं बरं नाही. तुमची भूमिका दिवसेंदिवस अधिकच...ती . ही...होतेय्...

(निघून जातो.)

मंत्री : चांगला माणूस आहे. तडफदार आहे

बॅं. . वाटलच तसं !

देशमुख जुना ओळखतो मी त्याला !

मंत्री : आपल्या पेपरमध्ये अशी माणसं हवीत विचारा त्याला देशमुख, येणार का म्हणून.

देशमुख . पण पगाराचं...?

मंत्री : बाकीच्याना पालेकर आयोगाची वेतनश्रेणी आहे ना. आपल्या वर्तमानपत्रातल्या लोकाना आपण आपलीच वेतनश्रेणी देऊ !

वसंतराव . 'पी. आर. श्रेणी.'

मंत्री . माझं नाव नको, आपण त्याला 'नेताजी पालकर वेतनश्रेणी' नाव देऊ. आपल्या राज्यातलं स्वतंत्र ऐतिहासिक नाव..

सर्व : व्वा ! व्वा ! सुरेख नाव ! त्यातही इतिहासाचा अभिमान आलाच. केवढं हे महाराष्ट्राच्या इतिहासावरच प्रेम !

बॅं. : पण साहेब, आपल्या वर्तमानपत्राचं नाव काय ?

मंत्री : काय असावं ?

देशमुख : महाराष्ट्र ?

वसंतराव : भवानी ?

बॅं. . लोकवार्ता ?

मंत्री . माझ्या मनात आहे ते नाव कसं वाटतं बघा हा...

सर्व . (उत्सुकतेनं) कोणतं ?

मंत्री : राजीव समाचार !

सर्व : (क्षणभर विचार केल्यासारखं करून) व्वा ! व्वा ! अप्रतिम ! दुसरा विचारच नको आता !

देशमुख : आता एवढंच सांगा साहेब, सुरू कधी करायचं ?

मंत्री : सगळी योजना घेऊन आता दिल्लीलाच चाललोय् श्रेष्ठींनी हिरवा कंदील दाखविला की किती अवकाश !

[ सगळे जयजयकाराच्या घोषणा देऊन उठतात. एका सुरात 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची' गात राहतात. ]

—विजय


प्रसिद्ध झाले.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

एक होता कार्व्हर

लेखिका : सौ वीणा गवाणकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य : रुपये पंधरा

# पुण्यातले पोलीस

पृष्ठ १ वरून

नोंदवणाऱ्यालाच हैराण केलं जातं.

'समाजकंटकाना आळा घालण्यासाठी पोलीस खात्याला सहकार्य करा!' अशा नुसत्या जाहिराती आणि आवाहनं प्रसिद्ध होतात; पण प्रत्यक्षात काय घडतं? आमच्या आळीत जुगाराचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. आळीतल्या एका सज्जन माणसाने त्याबद्दल पोलीस चौकीवर जाऊन पोलिसाना माहिती दिली. त्याला वाटलं, पोलिसांना ते माहितच नसावं. यावर पोलिसांनी काय केलं? पोलिसांनी त्या अड्ड्याच्या दादालाच जाऊन सांगितलं की, आपल्या आळीतला तो अमुक अमुक मनुष्य तुझ्याविरुद्ध तक्रार करत होता! झालं. दादानं दोन–चार गुंड पाठवून त्या सज्जन माणसाला असा काही दम भरला की, पुढे शेजारच्या घरात खून पडला तरी पोलीस चौकीची पायरी चढायची नाही, असा त्या माणसानं निश्चयच करून टाकला!'

पुण्यातल्या भुरट्या चोऱ्या व इतर निरनिराळ्या प्रकारच्या गुन्ह्यांचं प्रमाण दिवसेदिवस वाढतच आहे. जबरी चोरीचे रोज दोन–चार तरी गुन्हे घडतातच; पण यापैकी फार थोड्या गुन्ह्याचा योग्य तपास लागतो. असं का? एक वरिष्ठ पोलीस-अधिकारी या प्रश्नाचं उत्तर देताना म्हणाला, 'तुम्ही पेपरमध्ये वाचलंच असेल की, सध्या चालू असलेल्या जनगणनेमध्ये उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार पुण्याची लोकसंख्या आता बारा लाखाच्या पलीकडे गेली आहे. त्यामुळं पुणं आता 'महानगर' म्हणून गणलं जाईल; पण या महानगरासाठी असलेला पोलीस बंदोबस्त किती आहे? अभ्यासकानी या संदर्भात केलेल्या पाहणीत असं आढळलं आहे की, पुणे शहराच्या गरजेच्या फक्त एकतृतियांश पोलीस आज या शहरासाठी उपलब्ध आहेत।

'शिवाय या शहराच्या होत असलेल्या पसाऱ्याच्या मानानं किंवा लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस चौक्यामध्येही पुरेशी वाढ झालेली नाही एकच उदाहरण देतो. आपल्या पुण्यातल्या कर्वेरोडवरून सरळ कोथरूडपर्यंत गेलं की पौड फाट्यापाशी समोरच असलेल्या पोलीस चौकीच्या हद्दीत भोवतालचे कोथरूड, वारजे, हिंगणे आणि पौड फाटा हे चार परिसर येतात. म्हणजे वारज्याचा किंवा हिंगण्याचा माणूस 'घरात चोरी झाली आहे', हे सांगायला चौकीवर येऊन पोलिसाना घेऊन घरी जाईपर्यंत चोरांनी त्याच घरसुद्धा ट्रकात भरून नेलेलं असेल!

'इतकी प्रचंड गैरसोय आणि अव्यवस्था असताना पोलीस तरी बंदोबस्त किती आणि कुठवर ठेवणार? शेवटी तीही माणसंच आहेत. तीही वैतागून म्हणतात, 'जाऊ दे मरू दे! माझ्या चौकीची हद्द गुन्हा घडला त्या स्पॉटच्या फूटभर अलीकडेच संपते!'

सबइन्स्पेक्टर-इन्स्पेक्टर या पातळीवरच्या अधिकाऱ्याच्या कारभारासंबंधी माहिती मिळाली होती, पण हातात एक दंडुका घेऊन अर्ध्या चड्डीवर दिवस–रात्र रखडण्याऱ्या साध्या कॉन्स्टेबलची या विषयावर काय प्रतिक्रिया असेल? काही कॉन्स्टेबल्सना गाठून बरंच छेडल्यावर एकजण म्हणाला,

'साहेब, मी गेली तीस वर्षं पोलीसखात्यात आहे आणि हा सर्व काळ मी झोपडपट्टीतच राहिलो आहे! आता स्वतःच झोपडपट्टीत राहणारा माणूस उद्या त्याच झोपडपट्टीतील गुंडगिरीविरुद्ध कारवाई करायची भाषा करायला लागला तर तोच जाग्यावर राहणार नाही! आम्हाला पुरेसा पगार नाही, राहयला चांगली जागा नाही. आमची ती मॉडर्न कॉलेजसमोरची पोलीसलाइन म्हणजे तरी काय आहे? फक्त सिमेंटची झोपडपट्टी! आम्ही काय इथली कायदा नि सुव्यस्था राखणार? गुन्हेगारीचा उगम आणि वाढ मुख्यत्वे झोपडपट्ट्यामधूनच होत असते. त्याला आळा घालणारेही जर झोपडपट्टीतलेच रहिवासी असतील तर ते काय आळा घालणार कपाळ?

'आमचा पगार तरी किती, हल्लीची महागाई किती, कशाचा कशाला मेळ नाही आणि सारखी कंपॅरिझन मात्र त्या इंग्लंडतल्या बॉबीशी! त्यातही जो साहेब तत्त्वानं वगैरे वागायचा प्रयत्न करील त्याला हाताखालची माणसंसुद्धा हाकून लावतात, मग आमच्यासारख्या कॉन्स्टेबललोकाची काय कथा!'

माझ्यासमोर बोलत असलेल्या कॉन्स्टेबलच्या डोक्यावरची तांबडी फीत लावलेली काळी टोपी, तो खाकी शर्ट व अर्धी चड्डी, चामड्याचा तांबडा पट्टा, ते नाल ठोकलेले सॅंडल सगळं गळून पडलं होतं· तो एक प्रामाणिक माणूस स्वच्छपणानं बोलत होता. कोणताही आडपडदा न ठेवता. फक्त पोलीस, फक्त गुन्हेगार, फक्त पुणेकर नागरिक असे स्वतंत्र कप्पे पाडून तो बोलायलाच तयार नव्हता त्याच्या आणि माझ्याही नकळत तो इथल्या व्यवस्थेवरच बोट ठेवत होता– 'Something is rotten not only in the state, but in the system itself', असं त्याच्या अनुभवातून तो बजावत होता.

गेल्या काही महिन्यांत पुण्यातली गुन्हेगारी, चोरी–दरोडे, गुंडगिरी याचं प्रमाण वाढू लागल्यान इथल्या पोलीसखात्याच्या अवस्थेचा घेतलेला धावता आढावा. या अवस्थेत जर लवकर बदल घडला नाही तर पुण्याचं कलकत्ता व्हायला फारसा वेळ लागणार नाही, असा इशारा देणारा! बाकी कोणाला नाही तरी पुण्याच्या नव्या पोलीस-आयुक्ताना तरी या इशाऱ्याची वेळीच दखल घ्यावी लागेल, कारण त्याच्या कारकीर्दीची सुरुवातच चढणीवर होत आहे.

—प्रतिनिधी

तिसरी आवृत्ती संपत आली.

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

चित्रपट

# 'क्रॅमर'च्या निमित्ताने

पाचसहा पारितोषिकं मिळालेला, सर्वांनी नावाजलेला असा क्रॅमर विरुद्ध क्रॅमर बघून आले. घरात शिरतेय तोच मेहुण्यांचा मिश्किल प्रश्न कानावर पडला.

'काय गं ! मग पोरांना घरात सोडून करिअरसाठी घराबाहेर पडायची मानसिक तयारी झाली की नाही ?'

'छे ! कधीच नाही. १२ वर्षांत एकदा देखील वाटलं नाही–' इति मी.'

'बघा मी म्हटलं नव्हतं, की भारतीय स्त्री घर सोडून निघून जाणं अवघड आहे. कुणीही पटकन् हो म्हणणार नाही !' वन्सं म्हणाल्या.

आमचा हा संवाद संपतोय तोच मैत्रीण नि तिचा नवरा आले. गप्पा मारताना त्यांचा केनयात जाण्याचा विषय निघाला. तिनं सागितलं त्यांनी मुलांच्यासाठी जाणं कॅन्सल केलं. मी आश्चर्यचकित चेहरा करून तिला विचारलंच त्याबद्दल तर म्हणे,

'अगं, मुलाच्या शिक्षणाची आबाळ होईल म्हणून हे त्याना बरोबर घेत नव्हते नि एवढी चार-पाच वर्षे मी मुलांशिवाय रहायला तयार नव्हते.'

खरं म्हणजे तिचे आई-वडील नातवंडांना सांभाळणार होते; पण बराच मोठा काळ असल्यानं त्याना त्रास द्यायची तिच्या मनाची तयारी होत नव्हती.

ते दोघे गेले. परदेशगमनाची, वास्तव्याची एवढी छान सोन्यासारखी संधी त्यानी गमावली याबद्दल माझ्याच मनाला हुरहूर लागली होती. त्याच मनानं मैत्रिणीच्या म्हणण्याला होकार पण दिला होता. कारण इतरानी कितीही मायेनं, प्रेमानं केलं तरी आई-बाबा नसताना मुलं खरंच हिरमुसली होतात हे खरं.

हात काम करत होते; पण मनात घर करून बसली होती 'क्रॅमर' मधली जोआना. स्वत च्या करिअरसाठी सात वर्षांच्या मुलाला घरी बापाजवळ सोडून एकटी घराबाहेर पडणारी अमेरिकन संस्कृतीतली स्त्री. पुढारलेल्या सुधारलेल्या जगाची प्रतिनिधी !

माझी मैत्रीण का नाही गेली ? तिची मुलं तर कुणाही नातेवाइकाजवळ राहण्याइतकी मोठी होती. मुलांच्या संस्कारक्षम अशा नाजूक वयाच्या काळात आपण जाऊ नये किंवा जाणं बरोबर नाही असा विचार तिनं का केला ?

जोआनानं पण हा विचार केला असणार, त्याखेरीज ती बिली सात वर्षांचा होईपर्यंत थांबली नसणार; पण शेवटी फक्त चूलमूलच करत राहण्याचा तिला वीट आला असणार. नव्हे तसंच होतं नि ती स्वत्व शोधण्यासाठी मुलाला, नवऱ्याला, त्याच्यावरील मायेला मोठ्या कष्टानं दूर सारून निघून जाते !

आजच्या अमेरिकन संस्कृतीचं, मनाचं, विचारांचं अतिशय उत्तम चित्रण करणारा तो चित्रपट मी पाहिला, पण मन होतं भारतीय. सदाशिवपेठी म्हणा हवं तर. मनाला पटलं नाही. आई घरात नाही म्हणून विस्कटलेला मुलगा नि बायको अशी अचानक निघून गेल्यानं विस्कटलेला टेड बघताना पोटात गलबलायला होत होतं डोळे पाणावत होते.

बिली आणि टेडनं रंगवलेले, मन हेलावून टाकणारे ते क्षण बघताना माझं मन मला हळूच प्रश्न करू लागलं होतं. खरंच मी गेले असते का अशी निघून ?

'छे ! कसं जाणार ? इतके पाय अडकलेत ह्या घरात, ह्या माणसात, अशी जणं शक्यच नाही ! आपली पोरबाळं, नवरा आपण गेल्यानं उध्वस्त होतील. त्यातून ना त्याना समाधान ना आपल्याला. आणि पोरं छान निघाली, नवरा मोठ्या मानाचा, मोठ्या अधिकाराचा धनी झाला, त्याच्या यशाची कमान चढत राहिली नि आपण तिच्याकडे मोठ्या अभिमानानं (आपल्या मनातल्या काही गोष्टी मनातच ठेवून) पाहिलं, त्याच्या यशाच्या अत्युच्च क्षणी त्याची साथ केली तर बिघडलं कुठं ? नाही तर मग नवरा नि मुलं हवीतच कशाला ? करिअरवाल्यानी लग्नच करू नये मग !'

'मग काय करावं ? एकटं रहावं ? आणि लग्न केलं तर घरात बसून रहावं ? नवरा केव्हाही, कितीही उशीरा आला तरी न कंटाळता पोरांचं सारं करून परत हसतमुखानं दारात स्वागताला उभं रहावं ? लग्न केलं म्हणून, पोरंबाळं झाली म्हणून स्वगुणाची समाधी बाधावी ? त्याना भूतकाळात गाडावं? स्वत चे कलागुण दडपून ठेवून घरात कोंडून रहावं ? त्यांना वाव मिळाला नाही तरी ?'

'पण मग जोआनं निघून गेल्यावर बिली आणि टेड किती केविलवाणे झाले होते !'

'काही नाही. झाले असतील पहिले दोन-तीन दिवस. मग जुळलं ना सारं व्यवस्थित ? जोआन निघून गेली म्हणूनच टेडला आपल्या बायकोला निराळं व्यक्तिमत्त्व आहे, ते तिला जपायचंय, फुलवायचंय नि त्याच्या आड आपण येतोय याची जाणीव झाली. तिला त्याखेरीज काही उपायच नव्हता. नाही तर आपल्याकडच्या स्त्रिया !

आवा निघाली पंढरपुरा
वेशीपासुन आली घरा !

ह्या पठडीतल्या. अशी मनाची घाटणी असलेल्या.'

इतका वेळ दोन मनांनी भांडून घेतलं नि मग दोघे एकत्र होऊन विचार करू लागली.

समजा मी घरातल्या कटकटींना, नवऱ्याच्या नवरेशाहीला, पोराच्या भांडणांना, चूलमूल करायचा कंटाळा आल्यानं कुठं बाहेर निघून जायचं ठरवलं तर कुठे जाणार ? काही सुचतच नाहीये जाण्यासारखं ठिकाण. भ्याड आहे म्हणून नाही; पण जाणंच शक्य नाही !

समाज मान्यता देईल ? पुरेसं संरक्षण नि पोटाला मिळेल ? माझं शिक्षण आजच्या या अति झपाट्यानं नि वेगानं पुढं जाणाऱ्या जगात चार पैसे मिळवून देणारं आहे की फक्त नवरा मिळवण्यापुरतं घेतलेलं आहे ? घरातून बाहेर पडल्यावर माझी मी स्वत च्या पायावर उभी राहू शकेन का ?

सगळ्या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच आली. शिवाय मला वाटतं आपली मनंच अशी घडवली गेली असतात की, संसाराचे पाश जोआनासारखे आपण चटकन तोडू शकत नाही. आपल्याला ते तोडायचेही नसतात. तोडावेसे वाटतही नाहीत. कारण आई, बायको झाल्यावर त्या त्या भूमिकासाठी समाजानं बनवलेल्या चौकटीत बसावं लागतं. नाही तर सारच चित्र केविलवाणं बनतं.

आता माझंच बघा नं, मोठ्या आवेशानं

लिहितेय सारं. पण सगळं घरकाम करायचंय; पोराना आवडणारी भाजी करायचीय. अहोंना चहाला उठवायचय. पोरं भांडली तरी, नवरा ओरडला तरी, त्याची माझी कशावरून तरी वादावादी झाली तरी ते सारं मनातच ठेवायचंय. त्या साऱ्याच्या यशाऱ्या कमानीकडे मान दुखेपर्यंत पहायचंय, कोतुकानं भरून जायचय नि या साऱ्यातून वेळ होईल तेव्हा तसं नि तितकंच आपलं व्यक्तिमत्त्व फुलवायचंय.

शेवटी जीवन म्हणजे काय ? तडजोडच ! ती सर्वांनाच करावी लागते. करायचीच असते !

—सौ. उमा नरवणे

# चित्रपटाबाहेर....

—सतीश जकातदार

## आणि 'शान' चं प्रदर्शन असं झालं !

सहा करोडचा 'शान' अशी आपल्या चित्रपटाची जाहिरात करणाऱ्या जी. पी. सिप्पीच्या 'शान' या चित्रपटाबाबत आमच्या असंख्य प्रेक्षकाप्रमाणेच आयकर अधिकाऱ्यांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सिप्पीसाहेबाची भेट घेण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

भेट झाली नाही म्हणून म्हणा किंवा भेट टाळली म्हणून म्हणा आयकर अधिकाऱ्यानी प्रयोगशाळेत जाऊन 'शान' च्या प्रिंटसवर जप्ती आणली. अधिकाऱ्यानी मोका साधला, पण सिप्पी चागलेच खवळले

असं म्हटलं जातं की सिप्पीसाहेबानी तडक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ए. आर. अंतुले याच्याशी 'हॉट लाइन' साधली आणि त्यांना 'संजय गांधी मेमोरियल ट्रस्ट' च्या मदतीसाठी होणारा 'शान' चा चॅरिटी प्रिमियर शो रद्द करण्याची धमकी दिली

बस, एवढं पुरे होतं सिप्पी 'कामयाब' झाले व यानंतर जे व्हायचं तेच झालं. 'शान' च्या प्रिंटस्वरील जप्ती उठविण्यात आली. प्रिमियर शो झाला त्याला मुख्यमंत्री पण आले आणि साऱ्या देशात 'शान' प्रदर्शित झाला !

## खलनायकाच्या भूमिकेत 'आयकर अधिकारी'

काळ्या पैशाचं साम्राज्य असणाऱ्या चित्रजगतात ९ डिसेंबरची रात्र म्हणजे 'कत्तलरात्र' च ठरली. नाज चित्रपटगृहाच्या परिसरातील निर्माते-वितरक, चर्नीरोड-मरीन लाइन्सच्या दरम्यान असलेल्या सिंधी फायनान्सरच्या चावड्या, विविध प्रयोगशाळा आणि जुहू-पाली हिल परिसरातील अलीशान बंगल्यात या रात्री राज्य होत आयकर अधिकाऱ्यांचं !

कुठे, कोणाच्या तिजोरीतल्या डायरीत (अगदी फिल्लम स्टाइल) ३।। लाख रुपयाचे हिरे मिळाले, तर कोणाकडे ६२ लाख रुपये रोख मिळाले, तर एका प्रयोगशाळेत अनेक किलो बेकायदेशीर चादी मिळाली !

एकंदरीत फिल्म इंडस्ट्रीतील सर्वच 'ग्रेट गॅम्बलर' घावरले, त्रस्त झाले शूटिंगच्या तारखा रद्द करून निर्माते, वितरक, कलाकार, तंत्रज्ञ सर्वांनीच आपापल्या 'कर चुकवावे कसे' याचे शास्त्र जाणणाऱ्या निपुण सी. ए बरोबर रात्र जागविण्यास सुरुवात केली. अनेकानी राजकीय पुढाऱ्याकडे मनधरणी केली. मात्र सिप्पी एकटेच यशस्वी ठरले. 'पॅट्रियट' मनोजकुमारने पंतप्रधानांशी संपर्क साधला; पण तोही अयशस्वी ठरला आणि मग सर्वांचाच 'रात्रंदिन युद्धाचा प्रसंग' सुरू झाला.

या धाडीमुळे चित्रपटनिर्माते इतके त्रस्त झाले की त्यातील एकाने आपल्या आगामी रंगीत चित्रपटातील आर्थिक पातळीवर मात्र ('ब्लॅक अॅण्ड व्हाइट चित्रपटात) खलनायकाचे नाव कमलेश अरगल ठेवण्याचे निश्चित केले आहे. कमलेश अरगल हे आयकर विभागाचे असिस्टंट डायरेक्टर असून त्याच्याच नेतृत्वाखाली या धाडी टाकण्यात आल्या होत्या !

## 'झुमरीतलैया' वाल्यांची रफीला श्रद्धांजली

सिलोन, विविधभारतीवरील 'आपनी के गीत' किंवा 'फर्माइश' गीतामध्ये नियमितपणे झुमरीतलैया, राजनंदगाव या दोन गावातून गाण्यांची फर्माइश करणाऱ्याचा मोठा भरणा असतो, या दोन कार्यक्रमात या गावाचा उल्लेख दररोज इतक्या वेळा होतो की इथले लोक फक्त या दोन केंद्राना पत्र पाठविण्याचेच काम करतात की काय, असा प्रश्न पडतो. केव्हाही रेडिओ लावला तरी 'झुमरीतलैयासे अमुक तमुक' व राजनंदगावसे तमुक-अमुक' असा उल्लेख आढळतो.

परतु आता झुमरीतलैयातील गावकऱ्यानी पै. महमद रफी याच्या नावाने एक रुग्णालय बाधण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या आवडत्या गायकाची स्मृती जतन करण्याच्या हेतूने गावकऱ्यानी हा निर्णय घेतला असून प्राथमिक स्वरूपात रुग्णालय-सेवा सुरूही झाली आहे. रुग्णालयातर्फे चिकित्सा विनामूल्य केली जाणार आहे. ☐


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये


राजहंस प्रकाशन, पुणे

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

# 1980 त
# केली पायाभरणी
# 1981 त करूं
# या उभारणी

1980 त भरमसाठ वाढत्या चलनवाढीला पायबंद घालण्यात आला आणि त्याबरोबरच, कोळसा, वीज, औद्योगिक वस्तु आणि अन्नधान्य यांच्या उत्पादनात भरीव वाढ करण्यात आली.

समाजातील कोणताहि गट, राष्ट्रीय उत्पन्नात मोठया वाटयाची मागणी करण्यापूर्वीच, मिळविलेल्या यशाला भक्कम करून, उत्पादन वाढवणें हीच आजची गरज आहे.




## आमचे परवलीचे शब्द
## कठोर परिश्रम आणि आत्मनिग्रह

davp 80/449